मंगळवार, २१ नोव्हेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १०३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 21 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-103 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

## पक्षकारांनी न्यायालयात येण्याची वाट का पाहात होते ?

### न्यायमूर्तींनी राज्यपालांना सुनावले : आम्ही आदेश काढल्यानंतरच विधेयकांवर निर्णय घेतला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पर्दीवाला व न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोरील सुनावणीदरम्यान सोमवारी न्यायालयाने राज्यपालांना सुनावले. ॲटर्नी जनरल महोदय, राज्यपाल म्हणतात की, त्यांनी १३ नोव्हेंबर रोजी ही विधेयके निकाली काढली. १० नोव्हेंबरला आम्ही यासंदर्भात आदेश दिले होते. ही विधेयके जानेवारी २०२० पासून प्रलंबित होती. याचा अर्थ आम्ही आदेश काढल्यानंतरच राज्यपालांनी विधेयकांवर निर्णय घेतला. गेली तीन वर्षं राज्यपाल काय करत होते? या प्रकरणातील पक्षकारांनी सर्वोच्च न्यायालयात येण्याची राज्यपाल वाट का पाहात होते? असा परखड सवालच सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी केला आहे.**



देशातील अनेक राज्यांमध्ये राज्यपालांनी महत्त्वाची विधेयके जाणूनबुजून प्रलंबित ठेवल्याचा आरोप त्या त्या राज्य सरकारांनी केला असून त्यावर सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. यासंदर्भात तामिळनाडूच्या राज्यपालांना सर्वोच्च न्यायालयाने १० नोव्हेंबर रोजी प्रलंबित विधेयकांवर निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. आता पुन्हा एकदा न्यायालयाने या राज्यपालांना फटकारले आहे. तामिळनाडू, केरळ, पंजाब या राज्यांमध्ये राज्यपालांकडून अनेक महत्त्वाची विधेयके कोणत्याही निर्णयाविना प्रलंबित ठेवली जात असल्याचे या राज्यांमधील सरकारांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे. काही विधेयके तर तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. त्यातील तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांना सर्वोच्च न्यायालयाने प्रलंबित विधेयकांवर लवकरात लवकर निर्णय घ्या, असे आदेश दिले. यानंतर १३ नोव्हेंबर रोजी राज्यपालांनी विधेयकांवर पुनर्विचार व्हावा, असा शेरा लिहून परत पाठवली. यानंतर आता तामिळनाडूच्या विधानसभेने विशेष अधिवेशन घेऊन ही विधेयके पुन्हा मंजूर करून राज्यपालांकडे पाठवली आहेत. आता त्यावर राज्यपाल काय निर्णय घेतात, हे पाहून पुढील सुनावणी घेतली जाईल, असे न्यायालयाने सांगितले. यासंदर्भात १ डिसेंबर रोजी पुढील सुनावणी निश्चित करण्यात आली आहे.दरम्यान, विद्यमान राज्यपाल आर. एन. रवी यांनी नोव्हेंबर २०२१ मध्ये राज्यपाल पदाचा पदभार स्वीकारल्याचा युक्तीवाद ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमनी यांनी केला. मात्र, न्यायालयाने हा युक्तीवाद फेटाळून लावला. "इथे मुद्दा एका विशिष्ट राज्यपालांचा नाहीये. एकूणच राज्यपालांकडून घटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडताना विलंब केला जात आहे का? हा मुद्दा आहे, अशा शब्दांत न्यायालयाने परखड भूमिका मांडली.



## आकाशी झेप घे रे पाखरा



जयाद्री क्षितिजावर पसरलेला लालिमा आणि त्यातच येथे नव्याने पर्यटक, भाविकांना आकाशातून जेजुरी दर्शन पॅरामोटारिंग उड्डाण होत असतानाचे विहंगम दृश्य मानवी तंत्रज्ञान आणि निसर्ग रंगाची अनुभूती. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

## अजित पवार गटाकडून कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचीही प्रमाणपत्रे बोगस

### शरद पवार गटाचा युक्तिवाद

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अजित पवार गटाकडून केवळ कार्यकर्त्यांचीच नव्हे तर पदाधिकाऱ्यांचीही बोगस प्रमाणपत्र जमा करण्यात आल्याचा दावा शरद पवार गटाच्या अभिषेक मनु सिंघवी यांनी युक्तिवाद करताना हा दावा केला आहे. राष्ट्रवादी पक्ष कुणाचा, पक्षावर दावा कुणाचा याची सुनावणी निवडणूक आयोगात सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुरू असलेल्या सुनावणीसाठी शरद पवार गटाकडून अभिषेक मनु सिंघवी युक्तिवाद करत आहेत तर अजित पवार गटाकडून नीरज किशन कौल आणि मनिंदर सिंह युक्तिवाद करत आहेत. शरद पवार स्वतः या सुनावणीसाठी उपस्थित असून त्यांच्यासोबत खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार जितेंद्र आव्हाड उपस्थित आहेत. तर अजित पवार गटातर्फे पार्थ पवार निवडणूक आयोगात उपस्थित आहेत.केंद्रीय निवडणूक आयोगाने शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांची कानउघडणी केली. ज्या मुद्द्यांवर गेल्या सुनावणीत आपण युक्तिवाद केला होता त्याचे प्रतिज्ञापत्राच्या मुद्द्यांचा आपण पुन्हा उल्लेख करु नका, असे निवडणूक आयोगाने सांगितले. तेच तेच मुद्दे घेतल्याने आयोगाने नाराजी व्यक्त केली. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सरचिटणीस कुवर प्रताप सिंह हे शरद पवार गटाकडे आहेत. तसे प्रतिज्ञापत्रकही त्यांनी दिले आहे. असे असताना अजित पवार गटाकडून कुवर प्रताप सिंह यांची खोटी सही करून त्यांचे बोगस प्रतिज्ञापत्रक जमा करण्या आले असल्याचा दावा शरद पवार गटाकडून करण्यात आला आहे. अजित पवार गटाकडून खोटी कागदपत्रे जमा करून निवडणूक आयोगाची दिशाभूल करण्यात येत असल्याचा दावा सरद पवार गटाकडून करण्यात आला. शरद पवार गटाच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद अजित पवार गटाकडून खोडून काढण्यात आला. शरद पवार गटाकडून सातत्याने खोटी माहिती दिली जात आहे आणि तेच ते मुद्दे मांडले जात असल्याचे अजित पवार गटाने म्हटले आहे. या माध्यमातून शरद पवार गटाकडून वेळकाढूपणा केला जात आहे, त्यामुळे ही केस निकाली काढावी, अशी मागणीही अजित पवार गटाने केली आहे.

## एकनिष्ठ कुत्र्याचा दुखवटा पाळणारे अकलूज येथील धाईंजे कुटुंब..!

आधुनिक केसरी न्यूज


सुजित सातपुते

पिलीव : आपल्या स्वभावातील प्रामाणिक वृत्तीसाठी ओळखला जाणारा लोकप्रिय पाळीव प्राणी म्हणजे अर्थात कुत्रा. प्राचीन काळापासून कुत्रा हा प्राणी पाळला जातो. राखणदार व प्रामाणिक स्वभावामुळे आपल्या मालकाशी असलेले एकनिष्ठ नाते आणि आपल्या माणसांवर निरपेक्ष प्रेम ही सामान्यपणे कुत्र्याची वैशिष्ट्ये म्हणता येतील. जगात असे मोजकेच प्राणी आहेत, जे माणसांच्या अगदी जवळ राहतात. त्यापैकी कुत्रा हा एक असा प्राणी आहे जो माणसांवर खूप प्रेम करतो आणि माणूसही कुत्र्यांवर तितकेच प्रेम करतो. जगात जर लोक सर्वांत जास्त कोणत्या प्राण्याचे संगोपन करत असतील तर तो कुत्रा आहे. याचं सर्वात मोठं कारण म्हणजे त्यांची निष्ठा ते आपल्या मालकाशी इतके एकनिष्ठ असतात की त्यांच्यासाठी ते आपल्या प्राणांची आहुती देतात. तसं तर कुत्रेही खूप वेगवान असतात त्यांना काही शिकवलं तर ते पटकन शिकतात. अशीच एक कुत्री (मादी)चे नुकतेच निधन झाले आहे. ती म्हणजे माळशिरस तालुक्यातील अकलूज येथील रहिवाशी असलेले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) युवा आघाडीचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष किरण धाईंजे उर्फ के.डी. व त्यांची पत्नी सौ. शितल धाईंजे यांची स्टफी नावाची कारवाणी जातीच्या कुत्रीवर धाईंजे परिवाराचे शब्दांत न सांगण्याइतके प्रेम होते. तिला पोटाच्या मुलाप्रमाणे घरात वागणूक दिली जात होती. घरातील सदस्यांना जेवण असेल तेच जेवण




स्टफीला मिळत होते. स्टफीला वेगळी अशी खोली नव्हती ती बेडरूममध्ये बेडवरच झोपून असायची, आपल्या परिवारातील सदस्यांवर कोणी हात टाकला तर स्टफी समोरच्या माणसाच्या अंगावर धावून जायची. रात्री अपरात्री आपला मालक आला तर मालकाने दार वाजवल्यानंतर स्टफी आपल्या तोंडाने आतील कडी उघडायची. इतक्या लाडाची व समजूतदार असूनही अगदी दिवाळीच्या तोंडावरच सणासुदीच्या काळात स्टफी आजारी पडली. तिने खाणे-पिणे सगळे काही सोडले. हा सर्व प्रकार किरण धाइंजे यांच्या लक्षात येताच त्यांनी स्टफीला लागलीच दवाखान्यात हलवले व त्वरित उपचार सुरु केले. परंतु डॉक्टरांच्या हलगर्जीपणाने धाईंजे परिवारावर काळाने घावा घातला व स्टफीचा दुर्दैवी अंत झाला. स्वतःचे मित्र, नातेवाईक, अज्जी, चुलते मेले तरीही कधी डोळ्यात पाण्याचा एक थेंबही आला नाही. परंतु आपली स्टफी आपल्याला सोडून गेली हे समजताच किरण धाईंजे यांना अश्रू अनावर झाले व त्यांनी टाहो फोडला. एवढेच नाही तर त्यांची पत्नी सौ.शीतल धाईंजे व मुलेही ढसा-ढसा रडू लागली. आपल्या घरातील एक सदस्यच मयत झाला आहे, असे समजून त्यांनी स्टफीला आपल्या घरासमोरच दफन केले व तिसऱ्या दिवशी विधिवत पूजा करून स्टफिला सर्व कुटुंबाच्या समवेत श्रद्धांजली वाहिली.

घरातील सदस्य गेल्या प्रमाणेच दिवाळी साजरी न करता, नवीन कपडे न घेता दुखावटा पाळाला घरातील माणूस गेला तरी आज-काल लोक दोन दिवसात विसरून जातात परंतु स्टफी जाऊन आज दहा दिवस झाले तरी आजही स्टफीचा दुखवटा हा धाईंजे परिवाराच्या चेहऱ्यावर दिसून येत असल्याचे पहावयास मिळत आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

मराठवाड्यात बराच काळ मोगली सत्ता होती. त्याचा हा परिणाम !' मैं खुद तुम्हे लेने आऊंगा ' असंच त्यांना म्हणायचं होतं. मी बस स्टॅण्डवर उतरल्यावर त्यांना फोन केला की मी आलो आहे. ते म्हणाले, ' मी यायला लागलोय. ' ते येताहेत याचं रूपांतर काही भागात ' ते यायलेत ' असंही होतं. पूर्वी ' पोस्ट ' म्हटले की आमचं गावागावातलं पोस्ट ऑफिसच डोळ्यासमोर येई. ( ' माझे पौष्टिक जीवन ' या नावाची पुलंनी लिहिलेली एक खुमासदार कथा आहे. तिची लगेच आठवण येते. )पण आता ते पोस्ट राहिले बाजूला आणि इतर पोस्टचाच सुळसुळाट झाला आहे. फेसबुकवरची पोस्ट, व्हाट्सऍपवरील पोस्ट, फॉर्वर्डेड पोस्ट वगैरे वगैरे. आज पुलं असते तर त्यांच्या ' पौष्टिक जीवनात ' कितीतरी भर पडून ते आणखी समृद्ध झाले असते ! खरं तर आता नको तेवढ्या पोस्टचे उदंड पीक आल्यामुळे त्यांची ' पौष्टिकता ' खऱ्या अर्थाने लुप्त होत चालली आहे. असो. मोबाईल आणि कॉम्प्युटर यांचा परिणाम तर इतका भयंकर होतो आहे की भाषेत नवीनच क्रियापदे येऊ लागली आहेत. ' गुगल ' वरून मी गुगल केलं इथपर्यंत ठीक आहे पण लोक म्हणतात ' मी गुगललं '. एखादी पोस्ट पाठवू का याऐवजी ' सेन्डू ' का असाही शब्दप्रयोग करताना काही मंडळी आढळली. भाषेत ही किती मोलाची भर ! शुद्धलेखन हा तर आणखी वेगळाच भाग आहे. त्याबद्दल मी बोलतच नाही. काही मंडळी तर त्याबाबत बोलताना असं म्हणतात की भाषा हे संवादाचं माध्यम आहे. समोरच्याला काय बोलायचं हे कळलं की झालं. शुद्धलेखन वगैरेची फिकीर कोण करतं ! त्यामुळे आपले पूर्वज आणि वडीलधारी माणसं चिडून आता नेहमीसारखा ' आशीर्वाद ' देत नाहीत. तो ' आशिर्वाद ' किंवा बऱ्याच वेळा ' आर्शिवाद ' असतो. जाऊ द्या आपण कशाला नसता ' वाद ' वाढवायचा ! दुकानांच्या नुसत्या इंग्रजी पाट्या बदलून मराठी केल्या म्हणजे सगळं झालं असं होत नाही. त्यामागील हे ' राज ' सुद्धा समजून घायला हवं, नाही का ? तरच आपण म्हणू शकू ' माझा मराठीचा बोल कौतुके, परी अमृतातेही पैजा जिंके. '



# आनंदी पहाट

## स्वप्नावस्थेत सकारात्मकता परिवर्तन घडवते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या अंतर्मनांत येणारे विचार, विषय, घटना, अनुभव आपण अगदी जवळच्या, आपल्या हक्काच्या व्यक्तीजवळ बोलून दाखवत असतो. तसे करण्यामुळे आपल्या मनांत साठून राहिलेल्या गोष्टी बाहेर पडतात, त्यांना मोकळी वाट करून दिली जाते. निसर्ग नियमानुसार ते गरजेचे असते. आपल्या संवादातून, लेखनातून, देहबोलीद्वारे आणि विविध क्रिया-प्रतिक्रियांतून आपण व्यक्त होत असतो. व्यक्त न होणाऱ्या व्यक्तीची घुसमट वाढत जाते. मोकळेपणाने मनांतील विषय एखाद्याला सांगितले कि मनावरचा ताण, दडपण कमी झाल्याचे देखील जाणवते.

ह्या मोकळ्या होण्यातून आपल्या समस्यांचे निराकरण होत जाते. काहीवेळा उद्‌भवलेल्या प्रश्नांची उकल होत जाते. मनातील भय, न्यूनगंड दूर होण्याच्या दृष्टीने मोकळेपणाते आपल्या मनांतील शंका व्यक्त करणे उपयुक्त ठरते. आपल्याला पडलेले प्रश्न केवळ आपल्याच भ्रम आणि संभ्रमामुळे निर्माण होत असतात. प्रत्येक वेळेला प्रत्येक प्रश्नाची उत्तरे सारखी नसतात, प्रत्येकाचे प्रश्न निराळे असतात, उत्तरेही प्रत्येकासाठी भिन्न असतात. सरधोपटपणे रबरी शिक्क्याचा वापर केल्यासारखी प्रत्येकवेळी उत्तरे बरोबर येत नसतात. जसे व्यक्ती तितक्या प्रकृती तसेच, जसे आणि ज्यांचे प्रश्न तशी त्यांच्यासाठी उत्तरे, हे लक्षात घेणे जरुरीचे असते. एखाद्या समस्येचे उत्तर सर्वांनाच लागू होते असे नाही, हेही समजून घेणे आवश्यक असते. आपली स्वप्नावस्था आपल्याला जे हवे आहे ते मिळवून देण्याचे काम करत असते, एकप्रकारे आकर्षणाचा सिद्धांतच ह्याबाबतीत काम करत राहतो. आपल्या प्रत्येक बाबतीत काही-ना-काही वेगळेपण असावे, असे अनेकदा आपल्याला वाटत असते. इतरांपेक्षा मी आणि माझी प्रत्येक गोष्ट भिन्न असण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरु असते. त्यासाठी बदलत चाललेल्या जीवनमूल्यांचा स्विकार करावा लागतो.



आधुनिक केसरी

## घडावा स्वधर्म | शुद्ध भावे ||

भाव शुद्ध ज्याचा | ईश्वर तो जाणे ||
यातना भोगणे | नश्वरासी ||१||
कर्मावीण नाही | सुटका देहाला ||
आनंदा मुकला | कर्महीन ||२||
पाप-पुण्य दोन्ही | कर्माचे फलीत ||
जाणेल गुपित | धन्य साधु ||३||
साधना कर्माची | करावी नित्याने ||
यज्ञ कृष्णार्पणे | करोनिया ||३||
शास्त्राच्या आधारे | सिध्दकाचे कर्म ||
घडावा स्वधर्म | शुद्ध भावे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

मायबापीं भलतैसें असावें ।परी सासुरवाडीस नेटकें जावें ।
द्रव्य नसेल तरी घ्यावें ।रुण कळांतरें ॥३७॥
आंतर्भाव ते सासुरवाडीं ।मायेबापें राहिलीं बापुडीं ।
होताती सर्वस्वें कुडकुडीं ।तितुकेंच कार्य त्यांचें ॥३८॥
नोवरी आलियां घरा ।अती हव्यास वाटे वरा ।
म्हणे मजसारिखा दुसरा ।कोणीच नाहीं ॥३९॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सद्‌गुरु सन्तन पास में, कुछ दिन कर सत्संग ।
तज असत्य सत्य ग्रहण में, बोध प्रकाशित अंग ।।४२।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/४२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सद्‌गुरु आणि संतांच्या जवळ काही दिवस सत्संग केल्याने असत्याचा त्याग आणि सत्याचे ग्रहण होते आणि पूर्ण प्रकारे ज्ञान प्रकाशित होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

# समर्थ रामदास

आनंदवनभुवनाचे स्वप्न पाहिले. हिंदुस्थान बलसंपन्न व्हावा यासाठीच क्षात्रतेज व ब्राह्मतेज जागविले. 'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे। परंतु, तेथे अधिष्ठान पाहिजे। भगवंताचे।' या त्यांच्याच सूत्रानुसार भगवंताचे अधिष्ठान असलेली चळवळ निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. विविध विषयांतून लीलया समाजप्रबोधन करणाऱ्या समर्थांचे हे मुख्य उद्दिष्ट होते छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकोत्तर कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन रामदास स्वामी भारावून गेले. छत्रपती शिवाजी महाराज हे समर्थ रामदास स्वामींच्या विच्याराचे होते. स्वराज्य रक्षणासाठी समर्थ शिवाजी महाराजांन सोबत होते.[४] छत्रपती शिवाजी महाराजांनी ३१ नोव्हेंबर १६७८ मध्ये समर्थ रामदास स्वामींना एक विस्तृत सनद लिहून काही गावे इनाम म्हणून दिली होती. याबाबतचे एक पत्र इ. स. १९०६ मध्ये धुळ्याच्या शंकरराव देवांनी 'समर्थांची दोन जुनी चरित्रे' या ग्रंथात प्रकाशित केले होते; पण या वेळेस देवांना या पत्राची मूळ प्रत न मिळता एक नक्कल सापडली होती.



# शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी

साक्षात ब्रम्हदेवांच्या सांगण्या वरून असे कळते की जे जे दृष्य म्हणून आहे ते सगळे बाजूला सआरल्यआवर केवळ अदृष्य शिल्लक रहाते हाच ब्रम्हस्वरूपाचा अनुभव आहे. दृष्य आणि अदृष्य हे दोन्ही गोविंदाचीच रूपे आहेत. पण आपण व्यवहारात शुन्य म्हणजे अस्तित्व नाही असे म्हणतो. म्हणजेच ईथे ब्रम्हाच्या अस्तित्वाला नाहिसे करण्यात सारखेच आहे.म्हणून ब्रम्ह अनुभवास येण्यास जो उपाय केला तो अखेर अपाय ठरतो. याठिकाणी दृष्य सगळे ओलांडले म्हणजे अदृष्य शिल्लक उरते.ते शून्यरूप आहे.ते शून्यच ब्रम्ह आहे. खरे पहाता आपल्या अवतीभोवती दृष्य विश्व आहे. त्याच्या पलीकडे परब्रह्म आहे.आणि या दोघांच्या मध्ये शून्याचें स्थान आहे काही साधक या शून्यालाचं ब्रम्ह समजतात.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# नित्यनेम करणे म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

नित्यनेम करणे म्हणजे सर्वकाळ नित्यात राहणे. आपण मुळात स्वतःच नित्य असून अनित्यात राहिलो आहोत. नित्य जो परमात्मा त्याला विसरून, विषय जे अनित्य त्यात पडल्यामुळे आपल्याला त्याची आठवण होत नाही. त्याची ज्यामुळे आठवण होईल असे जे करणे त्याला नित्यनेम म्हणतात. आपण नेहमीच नित्यनेमात असावे, पण तसे होत नाही; म्हणून दिवसातून थोडा वेळ तरी त्याची आठवण होण्याकरिता काही वाचन आणि वाचलेल्याचे मनन करावे, म्हणजे त्याची सवय होते. जो अखंड नामस्मरण करतो तो नेहमीच नित्यनेमात असतो. नित्यनेम खरा कोणी केला असेल तर तो ब्रह्मानंदबुवांनीच. आपल्याला सदा नामात कसे राहता येईल याचा आपण विचार करावा. याकरिता गुरुआज्ञा प्रमाण मानणे हेच खरे साधन आहे. गुरू सांगेल तोच नित्यनेम होय. त्याला शरण जावे. रोज थोडेसे वाचन, त्यानंतर मनन, मननानंतर त्याप्रमाणे आचरण, आणि शेवटी गुरूस अनन्यशरण, हाच साधकाचा साधनक्रम आहे आणि हाच त्याचा नित्यनेम होय.



आपले आयुष्य जसजसे वाढत जाईल तसतशी साधकाची भगवंताला भेटण्याची उत्सुकता वाढत गेली पाहिजे. केवळ नेम आहे म्हणून उगीच करू नये; साधकाने कोणतीही गोष्ट मनापासून करायला शिकावे. साशंक वृत्तीने परमार्थात बिघडते हे ध्यानात ठेवावे. श्रद्धा हे परमार्थाचे मुख्य भांडवल होय. समाधान हेच सर्वस्व आहे अशी श्रद्धा ठेवावी. ज्याप्रमाणे थर्मामीटरने आपला ताप आपल्याला पाहता येतो, त्याप्रमाणे साधन करताना आपले आपल्याला समाधान किती झाले हे पाहिले पाहिजे. साधकाने जगातले दोष पाहू नयेत, कारण त्या दोषांचे बीज आपल्यामध्येच असते. लोकेषणा, मान फार घातक आहेत. मोठमोठे साधकसुद्धा त्यांच्यापायी अधोगतीला जातात. तसेच पैसा आणि कामवासना यांच्या मर्यादा ओलांडल्यामुळे मोठे साधनी लोकसुद्धा भगवंताच्या जवळ येऊन घसरतात. जगातले हे सर्व पाश आपल्याला बंधनात पाडतात. भगवंताचा पाश हाच खरा पाश. तोच आपल्याला सर्व बंधनांपासून मुक्त करून शाश्वत समाधानाचा लाभ मिळवून देतो.

जगाच्या मान-अपमानाला कधी भुलू नये. पैसा आणि कामवासना यांच्यापेक्षाही मान हा देहबुद्धीला जास्त चिकटून आहे. तिथे अगदी सावध असावे. जिथे आपल्याला मान मिळण्याचा संभव आहे तिथे जायचे टाळावे. टाळणे शक्य नसले तर 'हे भगवंताचे देणे आहे' असे मनापासून समजावे. जो खरा मोठा असतो तो कधी मानाची इच्छा धरीत नाही, आणि मान त्याच्याकडे आला तर त्याची क्षिती बाळगत नाही. आपल्याला मान आवडतो का ते पाहावे, म्हणजे त्यावरून आपल्या अंगी खरे मोठेपण किती आहे हे आपल्याला कळेल. जाता-येता देवाला नमस्कार करावा, 'राम, राम' म्हणावे. भगवंताचे प्रेम एकदा लागले की ते पुनः सुटणार नाही.

४०. भगवंताचा पाश हा पाशच खरा. पण तो आपल्याला बंधनापासून मुक्त करतो.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २१ नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# करखेलीची देशी दारूभट्टी ठरतेय व्यसनाची सप्लाय चेन

## कायद्याला फाट्यावर मारत गावागावात येथून दारू पुरविली जाते

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील करखेलीचे देशी दारू दुकान नेहमीच वादग्रस्त राहिलेले आहे. येथील कायदेशीर परवाना असलेल्या भट्टीतून सर्व बेकायदेशीरच धंदे चालतात. या गावापासून नजीक असलेल्या गावात खुलेआमपणे देशीदारूचे बॉक्स सप्लाय केले जातात. यातून शासनाला लाखो रुपयांचा चुना तर लागतोच पण अनेक अल्पवयीन बालकांना, तरुणांना गावातच सहज दारू उपलब्ध होतं असल्यामुळे अनेक जण व्यसनाधीन होऊन त्यांचे संसार उघड्यावर येत आहेत. धर्माबादचे पोलीस प्रशासन आणि उत्पादन शुल्क विभाग मात्र याकडे कानाडोळा करत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

यापूर्वी भाजपचे दत्ता शेंबाळे यांनी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केल्यामुळे तत्कालीन उपजिल्हाधिकाऱ्यांनी उत्पादन शुल्क विभाग, उपविभागीय अधिकारी व धर्माबादच्या तहसीलदारांना चौकशीचे आदेश दिले आहेत.

दत्ता शेंबाळे यांनी या तक्रारीत मुख्य आरोप केले होते की, सदर देशीदारू दुकानाला ज्या अकृषक भागात परवानगी दिली आहे. त्याठिकाणी ते दुकानच नाही.त्यामुळे ही भट्टीची शासन दरबारी ज्या ठिकाणी नोंद आहे. तेथेच त्याचे स्थलांतर करावे.यांची



गंभीर दखल निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव मुख्यमंत्री सचिवालयांनी घेऊन उपविभागीय अधिकारी व धर्माबादच्या तहसीलदारांनी सदर दारू भट्टीच्या ठिकाणाचा अकृषक (वाणिज्य ) परवाना आहे का? या भट्टी संदर्भात लोकांच्या काय अडचणी आहेत? सदर परवानाची जागा बदलता येईल का? या संदर्भात स्वंयस्पष्ट अभिप्रायसह अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. तसेच उत्पादन शुल्क विभागाला ही फटकारत परवाना दिलेल्या तारखेपासून जमीन वापरा संबंधाने अकृषिक (वाणिज्य) परवाण्याची तपासणी केली का? तसेच तक्रारदारांच्या तक्रारीच्या अनुषंगाने नेमकी काय कारवाई केली आहे? याचा ही अहवाल पंधरा दिवसात मागविले होते. मात्र या चौकशीचे पुढे काय झाले? दारू भट्टीचा परवाना एका ठिकाणी आणि भट्टी दुसऱ्याच ठिकाणी असेल तर ही शासनाची फसवणूक नाही का? या भट्टीवर उत्पादन शुल्क विभाग का कारवाई करत नाही.

सदर दारू दुकानातून या परिसरातील खेड्यामध्ये मोठ्या प्रमाणात दारू तस्करी होते. यामुळे शासनाचा शुल्क बुडते आणि लोकांच्या संसाराची राखरांगोळी होत आहे. तरी धर्माबादचे पोलीस प्रशासन याकडे का कानाडोळा करत आहे. पोलीस प्रशासनाने केवळ छोट्या गावातील विक्रेत्यावर कारवाईचा देखावा न करता मुख्य मुळावर घाव घालावा अशी जनतेतून मागणी होतं आहे.



# राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

## जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या विविध सेलच्या तालुका स्तरीय पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या नुकत्याच करण्यात आल्या आहेत. पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी नियुक्ती पत्र देऊन सदर पदाधिकाऱ्यांना नियुक्त केले आहे. जिल्हाध्यक्ष पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीत सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या तालुका प्रसिध्दी प्रमुखांनी दिली आहे.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे, तालुका अध्यक्ष गजानन सरनाईक,डॉ. गजानन बाजड, कैलास खानझोडे, भानुदास मवाळ, रमेश सदार, रामभाऊ हुंबाड, नितीन सरकटे, गणेश चोपडे, विनोद पाटील खडसे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सदर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांमधे युवक तालुका अध्यक्षपदी माधवराव शेवाळे यांची नियुक्ती करण्यात आली असून, बाळासाहेब देशमुख यांची उपजिल्हाध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तर पुंडलिक खानझोडे आणि भागवत बोडखे यांना राष्ट्रवादी काँग्रेस तालुका उपाध्यक्ष पदावर नियुक्त करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका प्रसिध्दी प्रमुख म्हणुन विनोद पाटील खडसे यांची वर्णी लागली आहे. शिवाय ईतर विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर झाल्यामुळे तालुक्यातील कार्यकर्त्यात उत्साह संचारला आहे. परिणामी जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्यावर प्रेम करणारे निष्ठावंत कार्यकर्ते तालुक्यात पक्ष बळकट करण्यासाठी जोमाने कामाला लागले आहेत. दरम्यान जिल्हाध्यक्ष पाटील यांनी मार्गदर्शन करतांना, पक्षाची ध्येयधोरणे घरा घरात पोहचविण्याचे आवाहन सर्व कार्यकर्त्यांना केले आहे.

# भारत विकास संकल्प यात्रा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात येणार : भागवत कराड

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची माहिती देशातील तळागाळातील घटकापर्यंत पोहचावी व त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा म्हणून या महिन्यातील दि,२८-११-२०२३  मंगळवार रोजी देशात"विकास संकल्प यात्रेचे" उदघाटन पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या उपस्थिती होत आहे ,असे प्रतिपादन केंद्र सरकारचे अर्थ राज्य मंत्री ना,भागवत कराड यांनी वैजापूर जवळील शेळकेवस्ती येथे दिवाळी स्नेह मिलन कार्यक्रमात  रविवार (ता.१९) रोजी केले, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मोहन आहेर, भास्कर आहेर व संपूर्ण आहेर परिवाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते,भारत विकास संकल्प यात्रेत शेती व्यवसाय, उद्योग व्यवसाय,ग्रामीण भागातील उद्योग ,बँक योजना माहिती,महिला सक्षमीकरण याबाबत मार्गदर्शन होणार आहे असेही ना,कराड उपस्थिताना संबोधित करतांना म्हणाले, दिवाळी स्नेह मिलन निमित्ताने त्यांनी सर्व वैजापूर वासीयांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक मोहन आहेर यांनी केले. या प्रसंगी भाजपा जिल्हा अध्यक्ष संजय खंबायते, माजी महापौर बापू घडामोडे,  एकनाथ जाधव, नारायण कवडे,मधुकर वालतुरे, कैलास पवार, ज्ञानेश्वर जगताप, कल्याण दांगोडे, मजाहारी गाढे, नबी पटेल,प्रशांत कंगले, शैलेश चव्हाण,गौरव दौडे, भाजपा महिला अध्यक्ष कल्पना पवार, सुनील पैठण पगारे, प्रशांत त्रिभुवन, गणेश इंगळे, गणेश खैरे, सुभाष तांबे, मनोज चोपडा, ज्ञानेश्वर टेके, सीताराम वैद्य, प्रभाकर ठाकूर (येवला), प्रदीप चव्हाण,कैलास चव्हाण, सौ. मंदा घायवट, बेबताई आहेर, नामदेव जाधब आबा पाटी ,यांच्या सह परिसरातील नागरिक उपस्थित होते. आहेर परिवारातील आकाश आहेर, उत्तम आहेर,कैलास आहेर विजय आहेर व सदस्य सहभागी झाले होते.




# सोयगाव तालुक्यात आता सरपंचांना १५ व्या वित्त आयोगाची एसएमएसद्वारे माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा परिसरात आता ग्रामपंचायतीच्या प्रशासनात पारदर्शकता ठेवण्यासाठी सरपंच आणि ग्रामसेवक यांची डीएससी (डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट) लागू करण्यात आली आहे. शासकीय निधीच्या इत्थंभूत माहितीसाठी शासनाने हा निर्णय घेतला असला तरी मंजूर निधीची माहिती ग्रामसेवकांना मिळते. मात्र आम्हाला माहिती मिळत नसल्याचा आरोप नेहमी सरपंच यांच्याकडून केला जात होता. मात्र आता सरपंच यांचा मोबाइल नंबर ई-ग्रामस्वराज प्रणालीमध्ये संलग्नित करण्यात आल्याने एसएमएसद्वारे माहिती मिळण्याची सुविधा उपलब्ध झाली असून त्यांच्यामध्ये असलेला नाराजीचा सूर दूर झालेला होता.गावातील मूलभूत सोयी-सुविधांसाठी केंद्र शासनाकडून १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत ग्रामपंचायतीच्या खात्यात थेट निधी जमा करण्यात येते. निधी खर्चात पारदर्शकता ठेवण्यासाठी डिजिटल प्रणाली लागू करण्यात आली आहे. निधी खर्च करताना सरपंच आणि ग्रामसेवकांच्या संयुक्त स्वाक्षरीने बिल देण्यात येते. परंतु या शासकीय निधीची माहिती सरपंचांना होत नव्हती. खचीत निधीचे बिल जोडून ग्रामसेवक देयक करतात. मात्र डीएससीला सरपंचाचे मोबाइल क्रमांक संलग्नित केले जात नाही, यामुळे शासन स्तरावरून प्राप्त खर्चित निधीची माहिती सरपंचांना - मिळत नाही. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या सरपंचांना प्रशासकीय स्तरावर असा दुय्यम दर्जा असल्याची -ओरड सरपंचांकडून होत होती. मात्र असे होत नसल्याने सरपंचांना ग्रामसेवकावर अवलंबून राहावे लागत होते. विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी सरपंचाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आर्थिक गैरप्रकार होण्याचीही दाट शक्यता होती. त्यामुळे हा व्यवहार - सरकारने पारदर्शक होण्यासाठी  डीएससीला सरपंच यांचा मोबाइल नंबर - संलग्नित करावा, अशी मागणी सरपंचांकडून करण्यात आली होती. ती पूर्ण करण्यात आल्याने तालुक्यातील सरपंच आनंदले आहेत.



## पॅलेस्टिनचा दावा

आधुनिक केसरी

पॅलेस्टिनच्या सरकारने ७ ऑक्टोबरला इस्रायलवर झालेल्या हल्ल्याबाबत मोठा दावा केला आहे. त्या दिवशीच्या इस्रायलवरील हल्ल्यात हमासचा सहभाग नव्हता, तर हा हल्ला इस्रायलनेच घडवून आणला, असा आरोप पॅलेस्टिनने केला आहे. याबाबत पॅलेस्टिनच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी केले आहे. यात त्यांनी इस्रायलने गाझावर केलेल्या हल्ल्याचे समर्थन करण्यासाठी इस्रायलवर हल्ला केल्याचा आभास निर्माण केला आणि त्यासाठी माध्यमांना माहिती पुरवली, असा आरोप पॅलेस्टिनने केला. द टाईम्स ऑफ इस्रायल वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानुसार, पॅलेस्टिनच्या परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले, इस्रायलने त्यांच्यावर हल्ल्याचा बनाव केला. ७ ऑक्टोबरला सुपरनोव्हा म्युझिक फेस्टिवल सुरू असताना इस्रायलच्या हेलिकॉप्टरनेच इस्रायलच्या नागरिकांवर बॉम्बहल्ला केला. तसेच अशी बनावट माहिती माध्यमांना पुरवली. पॅलेस्टिनने हे निवदेन जाही करताच बेंजामिन नेतान्याहू आक्रमक झाले. ते म्हणाले, मी हे अगदी स्पष्ट करू इच्छितो की, आम्ही हमासचा खात्मा केल्यानंतर गाझात जे प्रशासन चालवत आहेत त्यांना आम्ही दहशतवादाला पाठिंबा देऊ देणार नाही. सध्या पॅलेस्टिनचे स्थानिक प्रशासन दहशतवादी कृत्य होत असल्याला नकार देते, दहशतवाद्यांना पाठिंबा देते, दहशतवाद्यांच्या मुलांना दहशतवादासाठी आणि इस्रायलला उद्ध्वस्त करण्यासाठी प्रशिक्षित करते. आम्ही हमासचा पराभव केल्यानंतर गाझात हे होऊ देणार नाही, असा इशारा बेंजामिन नेतान्याहू यांनी दिला. पॅलेस्टिनचे परराष्ट्र खातं धक्कादायक दावे करत आहे. यात ते इस्रायलवर झालेल्या हल्ल्यात हमासचा सहभाग नसल्याचा दावा करत आहेत. पॅलेस्टिनचे अध्यक्ष मोहम्मद अब्बास यांनीही इस्रायलवरील हल्ल्यात हमासचा सहभाग नसल्याचा दावा केला आहे. युद्धाला ४४ दिवस दिवस झाले, तरीही पॅलेस्टिनचे अध्यक्ष मोहम्मद अब्बास (अबू माझेन) इस्रायलवरील हल्ल्याचा निषेध करण्यास नकार देत आहेत. नरसंहार झाला नसल्याचा दावा करणारे अब्बास हमास-आयसिसने नरसंहार केला नसल्याचा दावा करत आहेत, असेही नेतान्याहू यांनी नमूद केले.

## शिक्षणातील उदासीनता

आधुनिक केसरी

**सकाळची वेळ होती. नुकतीच थंडी पडायला सुरुवात झाली होती. थोडं उन्हात उभं राहावं म्हणून बाहेर उभा होतो. तास घ्यायला वेळ होता. तेवढ्यात एक म्हात्रे सर माझ्याकडे येत होते. लांबूनच हात जोडत ते म्हणाले, 'नमस्कार सर', मीही म्हणालो,' नमस्कार सर, या सर.' बाजूला खुर्च्या टाकलेल्या होत्या. त्या खुर्च्याकडं पाहून मी त्यांना म्हणालो, ' या सर,बसा सर.' ' हो सर, बसा,बसा.' सर आणि मी आम्ही दोघेही खुर्चीवर बसलो. मी सरांना म्हणालो, 'काय चालले आहे सर, कसे आहात. शाळा काय म्हणते?'**

'काही नाही सर, सध्या शाळा एके शाळा चालू आहे. सरकारचे अधून मधून काही पत्र येतात.तेही काम करावे लागते. दहावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म भरणे सुरू आहे.' ' शाळेचे, विद्यार्थ्यांचे वातावरण काय म्हणते ?' 'काही नाही सर,बरे आहे पण शिक्षणाच्या बाबतीत विद्यार्थ्याकडून मनावा तेवढा प्रतिसाद मिळत नाही. बळजबरीने त्यांना तयार करावे लागते.'

तेवढ्यात चंद्रे सर तिथे आले.म्हात्रे सर आणि चंद्रे सर दोघे जिवलग मित्र होते. त्या दोघांच्या गप्पा शाळेविषयी सुरू झाल्या. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संदर्भात ते एकमेकांना बोलत होते. मी मात्र त्यांच्या गप्पात सामील झाल्यासारखं ऐकत होतो. चंद्रे सर म्हात्रे सरांना सांगत होते, काल माझ्या पत्नीने एका विद्यार्थिनीला फोन केला. तो फोन त्या विद्यार्थिनीच्या वडिलांनी उचलला व म्हणाले,

'हॅलो, हॅलो, कोण बोलतंय.'

'हॅलो, हो मी नगांवकर मॅडम बोलतेय.'

'हं, बोला मॅडम.'

' तुमची कन्या आमच्याकडे दहावीला आहे. तिचा दहावीचा परीक्षा फॉर्म आता भरायचा आहे. उद्या शेवटची तारीख आहे. तुम्ही उद्या फी चे पाचशे रुपये व तिला सोबत घेऊन शाळेत या.' ' मॅडम,ती यावर्षी ऍडमिशन घेतल्यानंतर शाळेत कधी आली नाही. तीनं शाळा कधी केली नाही. परीक्षा फॉर्म भरून काय करायचे?'

'तुम्ही उद्या शाळेत तर येऊन जा.आपण बघू'

'मॅडम, तिला आता पुढे काही शिकवायचे नाही .'

'अहो, तसे नका करू, तिचा परीक्षा फॉर्म तर भरून घ्या, आम्ही बाकीचे बघू. आत्तापर्यंत तर ती इथपर्यंत आली आहे. पुढे बघू.या उद्या.'

' नको, नको मॅडम,तिचा परीक्षा फॉर्म भरायचा नाही. उगीच पाच सहाशे रुपये कुठून आणायचे.?'

'अहो, तसे करू नका. मुलगी पास होऊन जाईल. पैसे नसतील तर आम्ही भरू. तसे तिचे नुकसान करू नका.या उद्या.'

'अहो, मॅडम पैशाचं काहीच नाही. पैसे मी कुणाकडूनही उचलून (व्याजाने) घेईल. ते कसंही करून घेईल. पण तिला शाळेतील काहीच म्हणजे साधं लिहायला,वाचायला येत नाही. तेही तुम्ही तिला काही शिकवलं नाही. आता फीस भरून पुढे शिक्षण घेऊन काय उपयोग आहे.'

हे सारं ऐकताच मला राहवले नाही. मी लगेच त्यांना म्हणालो, ' हो ना सर, महाविद्यालयातील परिस्थिती ही तशीच वाईट आहे. मुलांना स्वतःचे नाव नीट व्यवस्थित लिहिता येत नाही. परीक्षेत उत्तर पत्रिकेवर नंबरही बरोबर लिहिता येत नाही. विद्यार्थ्यांचे,पालकांचे शिक्षणाकडे अजिबात लक्ष नाही. शिक्षणाचे मूल्य विद्यार्थ्यापर्यंत म्हणावं तेवढं पोहोचलेलं दिसत नाही.'

चंद्रे सर म्हणाले,

'अगदी बरोबर आहे सर तुमचं म्हणणं. तुमच्या मताशी मीही शंभर टक्के सहमत आहे.आम्ही कॉलेजला होतो त्यावेळचं शिक्षण वेगळं होतं. कडक होतं. शिस्तीचं होतं. संस्काराचं होतं. मूल्यांचं होतं. माणूस घडवणारा होतं. शिक्षकांचा धाक आणि दरारा होता. आता तसं काहीच राहिलेले दिसत नाही.'

त्यावर म्हात्रे सर म्हणाले , 'हो सर, सगळीकडेच असे शिक्षणाचे वातावरण गढूळ झाले आहे. त्याला आपण तरी काय करू शकतो. सरकारचेही नियम बदलत आहेत. आमच्यावेळी बोर्ड परीक्षा होती.आता बोर्ड परीक्षा बंद केली आहे.पूर्वी विद्यार्थी नापास झाला तर त्याला नंतर परीक्षा देऊनच पास व्हावे लागत होते. आता तसे राहिले नाही.'मी म्हणालो,

'अगदी बरोबर आहे सर तुमचं, सरकारलाही शिक्षण



व्यवस्थाच आता नष्ट करायची आहे. शिक्षण व्यवस्था फार गढूळ करून टाकली आहे. नापास झाल्यानंतर लगेच परीक्षा घेऊन पास करा म्हटले जात आहे. शिक्षणात नको ते बदल केले जात आहे. गुणवत्तेच्या नावाखाली नंगानाच सुरू केला आहे. आता तर नवीन शैक्षणिक धोरण आले आहे. शिक्षणाची फार वाट लावली जात आहे.'

त्यावर चंद्रे सर म्हणाले,

'अहो पालक तेवढेच म्हणून थांबले नाही तर ते म्हणाले की, नको नको तुमचं शिक्षण.काहीच कामाचे नाही. विद्यार्थ्याला साधे नाव गाव लिहिता-वाचता येत नाही. पुन्हा त्यात सरकार असले.नोकरी देत नाही.'

मी म्हणालो,'अगदी बरोबर आहे सर तुमचं, सरकारने गेल्या बारा पंधरा वर्षापासून नोकऱ्या देणे बंद केले आहे. कुठल्याही प्रकारची भरती नाही. कंत्राटी शिक्षण पद्धती आणली. कॉन्ट्रॅक्टवर शिक्षक नेमले गेले. जुन्या शिक्षकांनाही परत बोलावले गेले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. त्यामुळे पालकाचीही भूमिका उदासीन दिसत आहे.'

चंद्रे सर म्हणाले,' पालक अडाणी असूनही किती जागरूक आहे. त्याला आपल्या मुलीच्या शिक्षणाची दशा दिसत आहे. शिक्षकांनाही चिंतन आणि मनन करायला लावणारी आहे.'

म्हात्रे सर म्हणाले,

'अहो, तुमचे सारेच्या सारे खरं आहे. पण आपल्या नोकऱ्याचे काय? मुलं शाळेत राहिली नाहीत तर नोक-या कशा टिकतील. सरकारही आता शाळा बंद करायला लागलं आहे. शिक्षण बंद करत आहेत. खाजगीकरण करणे जोरात सुरू आहे. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून नोकरीचे स्वप्न आजच्या तरुणांचे भंग पावत आहे. हे सार अवघड आहे त्याला आपण काय करू शकतो?'

मी म्हणालो,

'माणसं हतबल होत आहेत. महागाई वाढत आहे. सामान्य माणसांचे पोट भरणेही अवघड झाले आहे. शिक्षणाचे महत्त्वही सरकारने कमी करून टाकलं आहे.'

म्हात्रे सर म्हणाले,

'अगदी बरोबर आहे सर तुमचं म्हणणं. ही सारी व्यवस्थाच खिळखिळी करून टाकली आहे. शिकलेला माणूस बोलायला तयार नाही. त्याच्या डोळ्या देखत मानवतेच्या मूल्याची राखरांगोळी होत आहे.तोही उघड्या डोळ्यांनी पहात आहे. काही बोलायला जावे, विरोध करायला जावा तर त्याचे बेहाल केले जातात. त्याला देशद्रोही ठरवले जाते. त्याच्यामुळे ही तो चूप आहे. सगळं दिसत असूनही बोलत नाही. शिक्षणाची ही दशा पाहून आतल्या आत रोज स्वतःचे मरण पाहत आहे.'

ही शिक्षणातील उदासीनता सगळीकडे पाहावयाला मिळत आहे.शिक्षणाविषयी विद्यार्थी जागरूक नाही.शिक्षणातुन काही मिळवावे,घ्यावे असे त्यांनाही वाटत नाही.

## अपयश हा शेवट नाही तर यशाचा आरंभ आहे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**निरंतर अखंडित प्रयत्न चिकटी जिद्द दैदिप्यमान इच्छाशक्ती असेल तर कोणत्याही प्रकारच्या अपयशाला घाबरण्याची आवश्यकता नाही. अपयश पचवता आल्या शिवाय यशाचा आरंभ होत नाही. अपयशाला कधीच नकारात्मक घेऊन चालत नाही धेय्य गठात असताना किंवा यशाच्या शिखरावर मार्गक्रमण करत असताना अनेक वेळा अपयशाला सामोरे जावा लागू शकते. यशाचा निकष हा प्रत्येकाच्या संदर्भात वेगवेगळा असतो. काहींना पाहिल्याच प्रयत्नात यश प्राप्त होत असतं तर अनेकांना अनेक प्रयत्न करावे लागतात. एकंदरीत निरंतर अंखडीत प्रयत्न असतील तर शेवटी यश मिळतच म्हणजे अपयश हि यशाची जननी असते.अपयश आलं म्हणून यश मिळणार नाही असं कधीच होतं नसतं.**

अपयश आलं म्हणजे यश मिळणार नाही. असफलता हि सफलतेचा पाया आहे.महणुन असफल झाल्यानंतर ,ताण तणाव न घेता ,नैराश्या मध्ये न जाता आपण जिथ कमी पडलो चुकलो त्यावर लक्ष केंद्रित करून पुन्हा प्रचंड मोठ्या जोमाने यश अर्जित करण्यासाठी कामाला लागलं पाहिजे .कारण असलफलेतुनच सफलता जन्म घेत असते . सफलता आणि असफलता यांचा खेळ म्हणजेच जीवन होय .प्रत्येक व्यक्ती च्या जीवनातील सफलता असफलता यांच परिगणित वेगळं असतं .जीवनातील कुठलिही असफलता हि अंतिम नसते.सफलता हि जीवनातील अशी एक सकारात्मक घटना आहे ज्याचे जीवनातील विविध बाबींवर वेगवेगळे परिणाम होतात . प्रत्येक व्यक्ती च्या जीवनातील सफलता असफलता याचं स्वरूप वेगवेगळे असते आणि त्याचे परिणाम देखिल वेगवेगळे येणार हे नैसर्गिक तर आहेच पण तो निसर्गाने घालून दिलेला वस्तू पाठ सुद्धा आहे. मेरा पाणी उतरता देख किनारे पे घर मत बसा लेना मैं समुंदर हू लोटके जरूर आऊंगा . जीवनातील अनेक अपयश ,संकटं वादळं ,पचवल्या नंतर अनेक पराभव झाल्यानंतर एखाद्या सुवर्ण अक्षरांनी लिहावं असं यश किंवा एखाद्या विजय जीवनात मिळत असतो . मुळात कुठलिही असफलता हि शेवट ची संधी नसते .म्हणून असफलतेतुनच सफलता हि जन्म घेत असते. याची जाणीव ठेवून वेळोवेळी,पावलो पावली आपण जागृत आणि सजग असलं पाहिजे.मानवी जीवन आणि सफलता व असफलत यांचा घनिष्ठ संबंध आहे. जन्मा पासुन मृत्यू पर्यंतचा संघर्ष म्हणजे जीवन आणि या




जीवनातील अनेक वेगवेगळ्या बाबी ,आपल्याला मिळविण्यासाठी प्रयत्न करावा लागतो. झगडावं लागत अनेक सुख दुःखांचा सामना देखील करावा लागतो .अनेक लोका असे आहेत की त्यांना आपल्या जीवनात प्रत्येक बाब पहिल्याच प्रयत्नात मिळते .महणजे अगदी सहजा सहजी मिळते.किंवा फार प्रयत्न न करता सुद्धा मिळते याचा अर्थ प्रत्येकाला याच पद्धतीने सफलता मिळेल असं नाही. सफलतेच गणित हे प्रत्येकाच्या जीवनात वेगळं आहे. अनेकांना प्रयत्न करूनही ती बाब मिळत नाही .पण बहुसंख्य लोक हे पहिल्या प्रयत्नात सफलता मिळाली नाही तर मग मात्र ते थेट प्रयत्न करणं च बंद करतात .आणि खरा घोळ इथंच आहे. उलट सफलता का मिळाली नाही आपण असफल का झालो याचे सद्सद विवेक बुद्धी नुसार मुल्यमापन करून मंथन चिंतन करण क्रमप्राप्त आहे . तसेच अगदी बारकाईने निरीक्षण करून अपयश आलं म्हणून नाराज न होता न थकता .ताण तणाव न घेता अगदी सहज आणि ज्ञान पुर्वक संशोधन करून अगदी बाराकाईने असफलते च्या मुळाशी जाऊन सफलता मिळविण्या साठी प्रयत्न केला पाहिजे. आपली , शक्ति, ताकद, मनोधैर्य, जिद्द, चिकाटी, मेहनत, प्रचंड आत्मविश्वास आणि नियमित नियोजन बद्ध प्रयत्न केले पाहिजेत जेणेकरून कुठल्याही क्षणी असफलतेच रूपांतर सफलतेत होईल कारण सृष्टी च्या रचनेनुसार नैसर्गिक नियमानुसार असफलते च्या उदारातुन सफलता हि नेहमी जन्मला येत असते .पण त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा सदैव नियमित न थांबता केली पाहिजे .प्रयत्न थांबले कि सगळं संपलं म्हणून असफलतेला सफलतेत परिवर्तित करे पर्यंत प्रयत्न थांबले नाही पाहिजे . एवढी क्षमता आपल्या मध्ये निर्माण झाली तर नक्कीच आपणं असफलते ला सफलतेत परिवर्तित करू शकतो.अगदी सहजपणे. म्हणून सदैव असफलते नंतर सफलता मिळणारच आहे कारण असफलता हि सफलतेची जननी आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# संविधान पुस्तक सोबत घेऊन टिपू सुलतान जयंतीचा दणका

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** टिपू सुलतान यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन कार्यक्रम करत असताना पोलीस प्रशास यांनी विरोध करीत अटक करण्याची मागणी केली परंतु आनंद लोंढे यांनी संविधानाचं पुस्तक सोबत घेऊन जिल्हाधिकारी यांचे कार्यालय गाठले. काही दिवसांपूर्वी टिपू सुलतान बॅनर लावण्या संदर्भात पालिका प्रशासन व पोलीस प्रशासनातर्फे आनंद लोंढे यांना बॅनर लावण्यासाठी मज्जाव केला होता तर ते बॅनर तात्काळ काढण्यात आले. त्यानंतर २० नोव्हेंबर रोजी टिपू सुलतान जयंती निमित्ताने पत्रकार भवन येथे अभिवादन कार्यक्रम ठेवण्यात आले होते परंतु तेथेही पोलीस प्रशासन तात्काळ येऊन त्यांना अटक करण्याची मागणी करू लागले व पक्षाचे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये वैचारिक वाद निर्माण झाला व आनंद लोंढे यांच्या आदेशाने सर्व पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते घोषणाबाजी करत संविधानाचे पुस्तक सोबत घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले संविधानाच पुस्तकात नमूद असलेले टिपू सुलतान यांच्या जयंतीचा उल्लेख व त्यांच्या महान कार्य संदर्भात जिल्हाधिकारी यांना दाखवत व इतर विषयांवर निवेदन देण्यात आले. निवेदनात असे म्हटले की टिपू सुलतान यांच्या जयंतीसाठी ज्यांनी विरोध केला आहे व पोलीस प्रशासनावर दबाव टाकला आहे त्यांच्यावर कारवाई व्हावी व लवकरात लवकर टिपू सुलतान यांच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी या ठिकाणी करण्यात आली.

# मुलींच्या लग्नाला सरपंचांकडून दहा हजारांची मदत

आधुनिक केसरी न्यूज



**पाटोदा :** तालुक्यातील चुंबळी गावच्या नवनियुक्त युवा सरपंच डॉ.रेशमाताई पवळ यांनी निवडणुकीत ग्रामस्थांना दिलेला शब्द खरा ठरवत गावातील दिनकर नागरगोजे यांच्या मुलीच्या लग्नासाठी 10 हजार रुपयांची मदत केली आहे.नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत डॉ.रेशमाताई पवळ यांनी ग्रामस्थांना प्रत्येक कुटुंबातील मुलीच्या लग्नासाठी प्रत्येकी 10 हजारांची स्वखर्चातून आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाची पूर्तता करण्यास त्यांनी आजपासून नागरगोजे कुटुंबाच्या विवाहास मदत करून केली आहे. यापुढे गावातील कोणत्याही आर्थिक दुर्बल व सर्व कुटुंबातील मुलीच्या विवाहासाठी प्रत्येकी दहा हजारांची स्वखर्चातून मदत करणार असल्याचे सरपंच डॉ.रेशमाताई पवळ यांनी म्हटले आहे.

# महाराणा प्रतापसिंह यांच्या इतिहासाला उजाळा मिळावा म्हणून पाच दिवसांचा दीपोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** शहरात मेवाळ योध्दा महाराणा प्रतापसिह यांच्या इतिहासाला उजाळा मिळावा या हेतूने जामनेर येथील केशरिया प्रतिष्ठांन, महाराणा उत्सव समिती व समस्त राजपूत बांधवाच्या वतीने जामनेर येथील महाराणा प्रतापसिह चौकात पाच दिवसीय दिपोत्सवाचेआयोजन करण्यात आलेले होते. या दिपोत्सव कार्यक्रमाला तालुक्यातील राजपूत समाज बांधवानी उपस्थिती लावून एक प्रकारे सामाजिक सलोखा दाखविला आहे.जामनेर येथील केशरिया प्रतिष्ठांन, महाराणा प्रताप उत्सव समिती व समस्त राजपूत बांधवांनी महाराणा प्रतापसिह चौकात दिपावलीच्या शुभ पर्वात पाच दिवसीय दिपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते. या दिपोत्सवाच्या माध्यमातून महाराणा प्रताप सिह यांच्या इतिहास, या योद्धयाचे समाजासाठीचे योगदान, समाजातील विविध घटकांना प्रोत्साहनपर इतिहास, सामाजिक एकता अशा विविध समाजहित जोपसणाऱ्या गोष्टीना उजाळा मिळावा म्हणून पाच दिवसीय दिपोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले होते.पाच दिवसीय दिपोत्सव कार्यक्रमात माता भगिनीच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महाराणा प्रताप सिह यांच्या प्रतिमेचे पुजन करून आरती करण्यात आली. या आगळ्या वेगळ्या उपक्रमास तालुक्यातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर तसेच तालुक्यातील समस्त राजपूत बांधवांनी उपस्थिती लावून एकमेकांना दिपावली व भाऊबीज सणानिमित्त शुभेच्छा दिल्या. याउपक्रमातून सामाजिक एकतेचे दर्शन दिसुन आले.



# कावनई येथील कपिलधारा तीर्थावर अन्नकुट महोत्सव उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** सिंहस्थ कुंभमेळ्याचे मुळस्थान समजल्या जाणाऱ्या इगतपूरी तालूक्यातील कावनई येथील कपिलधारा येथील प्रसिध्द तीर्थक्षेत्री शिवमंदिर, कपिलमुनी आश्रम व राममंदिरात अन्नकुट महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या अन्नकुट महोत्सवा निमित्त लाखो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या महोत्सवात अनेक साधु संत, साधक, भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी कपिलधारा तिर्थावर भक्तांनी महाअभिषेक, पुजन, अभिषेक हवन करण्यात आले. यानंतर सर्व भक्तांनी सामुदायिक महाआरती केली. या महोत्सवासाठी मंहत रामनारायणदास तथा फलहारी महाराज, उडीया महाराज, विश्वस्त कुलदीप चौधरी, दिपक मंगे आदींनी विशेष परिश्रम घेतले. संतोष दगडे, नंदलाल भागडे, निलेश आंबेकर, सनी पुणेकर, अनु पाटील, तुषार अवसकर, भारत काळे, प्रशांत येवलेकर, सुरेश चव्हाण, रनदीप चौधरी, गजानन चव्हाण, योगेश शिरसाठ, गोविंद चव्हाण, संजय जाधव, पप्पु हांडे, सोनु कस्तुरे, हरीश काळे, संदीप काळे, सतीष शिरसाठ, संदीप काळे, दिलीप लददड, सचिन लोढा, माऊली महराज भजनी मंडळा, भितोवन भागडे, निलेश राखेचा, समाधान जाधव, विक्रम मुनोत, जगन म्हसणे आदी भाविक उपस्थित होते. कपिलधारा तीर्थक्षेत्र या ठिकाणी फार प्राचीन काळापासून कुंभमेळ्याची सुरूवात होत असल्याने हे शिवतीर्थ व राम मंदिर प्रसिध्द आहे.




महाराष्ट्र Business Katta












# `मुन्नाभाई एमबीबीएस'ने नशीब पालटले...!

आधुनिक केसरी

**माणसाला जीवनाच्या कोणत्या टप्प्यावर यश मिळेल आणि त्याचे नशीब कधी फळफळेल हे कोणालाही ठाऊक नसते. अशाच एका अभिनेत्याने वयाच्या ३२ व्या वर्षी नाट्यक्षेत्रात पाऊल ठेवले आणि दहा वर्षांनी म्हणजे वयाच्या ४२ व्या वर्षी त्याला एक प्रायोगिक चित्रपट मिळाला. तो चित्रपट एका प्रख्यात निर्माता-दिग्दर्शकाने पाहिला काय आणि त्या कलावंताचे जीवनच बदलून गेले. त्या निर्मात्याने कराराच्या रकमेचा धनादेश (चेक) त्या कलावंताच्या हातात ठेवून आपल्या आगामी चित्रपटासाठी करारबद्ध केले. गंमतीची बाब अशी की त्यावेळी त्या चित्रपटाची ना कथा तयार होती ना त्याची काही रूपरेषा आखण्यात आली होती !**

या कलावंताचे नाव बोमन इराणी ! मुंबईतील एका पारशी कुटुंबात २ डिसेंबर, १९५९ या दिवशी त्यांचा जन्म झाला. त्यांचा जन्म होण्यापूर्वी सहा महिने त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. पतिनिधनानंतर परिश्रम घेऊन छोट्या बोमनचे पालनपोषण करणाऱ्या बोमन यांच्या आईलाही चित्रपटांची आवड होती. बरेच माता-पिता आपली मुले चित्रपटामुळे बिघडू नयेत म्हणून त्यांना चित्रपटापासून दूरच ठेवतात. पण बोमन यांची आई त्यांना विचारावयाची की तू शाळेचा गृहपाठ केला आहेस की नाही ? हो, केला आहे असे बोमन यांनी म्हणताच आई त्यांना सांगायची, की चित्रपटगृहात फार चांगला चित्रपट लागला आहे. जा तू पाहून ये. त्यात शिकण्यासारखे बरेच काही आहे. तो चित्रपट पाहून तू खूप काही शिकशील. बोमन म्हणतात, जेव्हा मी माझ्या आईच्या उदरात होतो आणि जेव्हा केव्हा ती चित्रपट पाहावयास जाई तेव्हा मीही तिच्यासमवेत तो चित्रपट पाहात असे. माझ्यात चित्रपटाबद्दलचे बेसुमार आकर्षण मी मोठा झाल्यावर निर्माण झालेले नसून मी आईच्या उदरात असल्यापासूनचेच आहे, यावर मी ठाम आहे. आमचे वेफरचे दुकान आई सांभाळत असे. मोठा झाल्यावर मी त्या दुकानात जेव्हा जेव्हा बसत असे तेव्हाही चित्रपट मला आकर्षित करीत असे. त्यावेळी त्या चित्रपटगृहात दाखविला जाणारा चित्रपट मी एकदा-दोनदा नव्हे तर पुन्हा पुन्हा पाहात असे. आजच्या काळात कोणतीही आई आपल्या मुलांना अशा प्रकारे चित्रपट पाहण्यासाठी प्रोत्साहन देत असेल असे मला वाटत नाही. दिवस सरत होते आणि अचानक एके दिवशी बोमन यांच्या आईची प्रकृती बिघडली. त्या आजारी पडल्यामुळे बोमन यांना सहा महिने दुकानात बसावे लागले आणि अखेर दुकान सांभाळण्याची जबाबदारीच त्यांच्यावर येऊन पडली. जवळजवळ बारा वर्षे त्यांनी दुकानदारी केली. वयाच्या ३२ वर्षांपर्यंत दुकानदारी केलेल्या बोमन यांनी नंतर एक साधा कॅमेरा खरेदी केला. छायाचित्रे काढण्याची लहान मोठी कामे करणाऱ्या बोमन यांना अशीही अर्थप्राप्ती होऊ लागली. ते आपली छायाचित्रकला जोपासत असतानाच हिंदी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले नृत्य दिग्दर्शक



शियामक डावर यांनी त्यांचा रंगभूमीशी संबंध जोडून दिला. काळ असाच पुढे सरकत असताना वयाच्या ४२ व्या वर्षी त्यांना `लेट्स टॉक मिली' हा प्रायोगिक चित्रपट मिळाला. त्याचे संपूर्ण चित्रीकरण अवघ्या आठ दिवसांत झाले होते. प्रयोगाखातर केवळ आठ दिवसांत चित्रित झालेला `लेट्स टॉक' हा चित्रपट तयार करून तसाच ठेवून देण्यात आला. हा चित्रपट चित्रपटगृहांमधे प्रदर्शित करण्यात येणार नव्हता. तयार करून ठेवून दिलेला हा चित्रपट निर्माते-दिग्दर्शक विधु विनोद चोपडा यांनी जेव्हा पाहिला तेव्हा त्यांना तो अतिशय आवडला आणि त्यातील बोमन इराणी यांचा अभिनय पाहून ते प्रभावित झाले. चित्रपट पाहिल्यावर बोमन यांना विधु चोपडा म्हणाले, तुम्ही तर चित्रपटांमधे काम केले पाहिजे. हा घ्या २ लाख रुपयांचा धनादेश (चेक) ! धनादेश हातात घेऊन बोमन यांनी त्यांना विचारले, की कोणत्या चित्रपटासाठी ? विधु चोपडा त्यांना म्हणाले, की सध्या तरी माझ्या हाती कोणताही चित्रपट नाही. यावर बोमन यांनी आश्चर्याने विचारले, `मग हा धनादेश कशासाठी ?' बोमन यांच्या या प्रश्नाला विधु चोपडा यांनी हसत हसत उत्तर दिले. ते म्हणाले, हा धनादेश देण्याचे कारण असे, की पुढील वर्षी डिसेंबरमधे मी चित्रपट बनवेन की नाही हे या क्षणी तरी मला ठाऊक नाही ; परंतु मी तुम्हाला आतापासूनच डिसेंबरसाठी नोंदवून (बुक) ठेवतो आहे. तेव्हा बोमन यांनी विचारले, की आतापासून कशासाठी ? यावर विधु चोपडा म्हणाले, `लेट्स टॉक' हा चित्रपट काहीही करून प्रदर्शित करू. जेव्हा तो प्रदर्शित होईल आणि लोक तुमचा अभिनय पाहतील तेव्हा प्रत्येक जण म्हणेल, की हा अभिनेता मला हवा. त्यावेळी तुम्ही मला तारखा देणार नाही म्हणून मी आजच तुम्हाला करारबद्ध करतोय. बरोबर सहा महिने उलटल्यावर विधु विनोद चोपडा यांनी बोमन इराणी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांना सांगितले, की माझ्याकडे एक चित्रपट आला आहे. बोमन यांनी विचारले, की कोणता चित्रपट ? चोपडा म्हणाले, 'मुन्नाभाई एमबीबीएस !' बोमन यांना चित्रपटाचे हे नाव काहीसे विचित्र वाटले. शेवटी डिसेंबर महिन्याच्या अखेरीस 'मुन्नाभाई एमबीबीएस' हा चित्रपट चित्रपटगृहांमधे झळकला. एका वर्षाच्या अखेरीला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने नव्या वर्षात बोमन इराणी यांचे जीवनच बदलून टाकले.

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

# दु:ख - ज्यांचे त्यांचे...



बबन दामोदर गुळवे
संपर्क क्र.९५४५४४२६४८.

आधुनिक केसरी

**सुशिक्षित घरची ती एक सुंदर व संस्कारी युवती. पदवी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेली.बुध्दीमत्ता प्रखर, भाषा मृदू आणि वर्तन नेक. आईवडिलांनी चांगले मनाजोगे स्थळ शोधले आणि धुमधडाक्यात तिचे लग्न लावून दिले.ती सासरला नांदायला गेली. पहिले दोन महिने सुखाचे व आनंदाचे क्षण वाट्याला आले. सासू व सासऱ्यांनी मायेचा लळा लावला, पतीदेवाचे प्रेम मिळाले. हळूहळू तिला सासरच्या मंडळींचा स्वभाव कळू लागला. नवरा, सासरे, सासू व ननंद चौघेही वागायला आणि बोलायला उथळ.**

त्यांना स्वतःचे व आपल्या घराण्याचे कोडकौतुक करायची खूप आवड. प्रत्येकवेळी त्यांच्या बोलण्यात आपला मोठेपणा सांगायची सवय. आपल्या श्रीमंतीचे कौतुक करताना ते जराही थकत नाहीत.'नाव मोठे लक्षण खोटे' या म्हणीचा त्या युवतीला प्रत्यय येऊ लागला.सासरच्या मंडळीच्या बटबटीत पणाचा तिला वीट येऊ लागला.तिचे हे दुःख कोणाला न सांगण्यासारखे आहे.तिला प्रचंड मानसिक त्रास देणारे आहे. केतन हा कुमार वयातील एक लाजरा बुजरा मुलगा.शालेय जीवनातील इयत्ता नववी वर्गात शिकतोय.त्याचे काही वर्गमित्र त्याला व्यसनांमध्ये अडकवण्याचा खूप खटाटोप करत आहेत.पण घरचे कोणीही कोणतेच व्यसन करत नाहीत याची पुरेपूर जाणीव त्याला आहे. त्यामुळे व्यसनी मित्रांपासून तो चार हात लांब राहणे पसंत करतोय. तरीही एकाच वर्गात असल्याने त्याचे ते मित्र त्याला नेहमी चिडवत आहेत. त्याला नपुंसक हे विशेषण लावत आहेत.हे दुःख कोण्या नातलगांना किंवा शिक्षकांना सांगावे वाटतेय पण हिंमतच होत नाही. त्यामुळे तो आतल्या आत खचून गेला आहे. आपले दुःख, आपल्या भावना कोणाला न सांगता आतल्या आत कुढत आहे. ती एक विधवा आहे. वय वर्षे अवघे पस्तीस.धुणी भांडी करून दोन मुलींचा सांभाळ करतेय. कोरोनाच्या भयंकर अशा काळात कोरोना रोगाने बाधित झाल्याने पतीचे निधन झाले. दुःखाचा डोंगर कोसळला.पतीच्या भावांनी जवळ केले नाही,शेतीचा वाटा दिला नाही. घरच्यांनी परके केले.परके मात्र वाईट नजरेने तिच्यावर पाळत ठेवून आहेत.तिच्या मजबुरीचा फायदा घेण्यासाठी टपून आहेत. तिला वासनांध नजरांचा किळस आलाय. तिचे ते दुःख कोणाला सांगू शकत नाही.फक्त पोटच्या मुलींसाठी ती जीवन जगतेय. एकटी असती तर तिने केव्हाच जगाचा निरोप घेतला असता! संदिप एक सुशिक्षित मुलगा. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्याने एम.बी.ए.चे शिक्षण पूर्ण केले. आईचा पाठिंबा मिळाला आणि त्याने तालुक्याच्या ठिकाणी स्वतःचा व्यवसाय सुरु केला. हळूहळू व्यवसायात यशस्वी झाला. आज तो चांगली कमाई करतोय. परंतु वडिलांचे दारूचे व्यसन त्याच्यासाठी डोकेदुखी ठरत आहे. काहीच कामधंदा न करणे, उदारीच्या पैशाने दारू पिणे आणि खूप नशा चढली की रस्त्यावर कोठेही पडून राहणे हा त्याच्या वडिलांचा दिनक्रम सुरू आहे. यामुळे संदिप आणि त्याची आई कमालीचे दुःखी आहेत. मूग गिळून गप्प आहेत. असे कितीतरी लोक आपल्या अवतीभवती वेगवेगळ्या दुःखांचं ओझं झेलत जीवन जगत असतात. हे दुःख त्यांच्या नातेवाईकांनीच त्यांच्या वाट्याला आणले आहे. आपल्या माणसांनी आपल्याच माणसांना दुःखाच्या दरीत ढकलणे हा मानवजातीला जणू शाप मिळाला आहे!



# सामर्थ्यशाली पंतप्रधान इंदिरा गांधी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारताच्या सर्वात सामर्थशाली पंतप्रधान इंदिरा गांधी यांची आज १०६ वि जयंती. इंदिरा गांधींची भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात सामर्थ्यशाली आणि महत्वपुर्ण नेत्यांमध्ये गणना होते. १९ नोव्हेंबर १९१७ रोजी त्यांचा जन्म झाला. इंदिरा गांधी यांना इंदिरा हे नाव आजी आजोबांकडून मिळाले. पण लहानपणी सर्वजण त्यांना प्रियदर्शनी म्हणून बोलवायचे. आई कमला नेहरु आणि वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून त्यांना देशप्रेमाचे बाळकडू मिळाले. लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. कारण त्यांचे पूर्ण कुटुंबच स्वातंत्र्य लढ्यात अग्रणी होते.**

लहानपणापासूनच स्वदेश आणि स्वदेशी याविषयी त्यांच्या मनात प्रेम निर्माण झाले. अगदी लहान असतानाच त्यांनी विदेशी खेळणी व कपड्यांची होळी केली होती. एका पाहुण्यांनी त्यांच्यासाठी विदेशातून आणलेला किंमती फ्रॉक परिधान करण्यास त्यांनी नकार दिला होता. आजोबा मोतीलाल नेहरू व वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांचे देश स्वातंत्र्य करण्यासाठी चालू असलेले आंदोलने पाहून आपणही या आंदोलनात सहभागी व्हावे असे त्यांना वाटे. वयाच्या अवघ्या १३ वर्षी म्हणजे सण १९३० साली त्यांनी आपल्या सवंगड्यांसह वानरसेना नावाची संघटना स्थापन केली आणि नेत्यांचे संदेश पोहचवण्याचे काम केले. इंग्रजांविरुद्ध मिरवणुका काढल्या, घोषणा दिल्या. त्यांचे सुरवातीचे शिक्षण अलाहाबाद, पुणे इथे झाले पुढे त्या रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन येथे शिक्षण घेण्यासाठी गेल्या. तिथे त्यांनी शिक्षणासोबत विविध कलाही आत्मसात केल्या. वडील पंडित जवाहरलाल नेहरू स्वातंत्र्याचा आंदोलनात अग्रणी असल्याने बऱ्याच वेळा ते तुरुंगातच असायचे अशा वेळी इंदिरा याच आई कमला नेहरू यांची काळजी घ्यायच्या. १८ फेब्रुवारी १९३६ रोजी कमला नेहरू यांचे निधन झाले तेंव्हा त्यांना खूप दुःख झाले. या दुःखातून सावरण्यासाठी वडील पंडित नेहरू यांनी त्यांना विदेशात शिकण्यासाठी पाठवले. विदेशातून शिक्षण पूर्ण करुन आल्यावर २६ फेब्रुवारी १९४२ रोजी फिरोज गांधी या उमद्या व देखण्या तरुणाशी त्यांनी विवाह केला. विवाहानंतर फिरोज गांधी व इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्याचा चळवळीत भाग घेतला. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर त्या संसारात रमल्या. राजीव आणि संजीव या दोन मुलांच्या पालनपोषणातच त्यांचा वेळ जाऊ लागला. पुढे त्या काँग्रेसमध्ये सक्रिय झाल्या. १९५९ साली त्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा बनल्या. यावेळी त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी खूप काम केले. १९६० साली पती फिरोज गांधी तसेच १९६४ साली वडील पंडित नेहरू यांचे निधन झाले तरी त्या खचल्या नाहीत. कठीण परिस्थितीतही त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. लाल बहादूर शास्त्री यांनी त्यांना मंत्रिमंडळात माहिती प्रसारण आणि नभोवाणी खात्याच्या मंत्रीपदाची जबाबदारी दिली त्यांनी ती लीलया पेलली. लाल बहादूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर २४ जानेवारी १९६६ रोजी त्या देशाच्या पंतप्रधान बनल्या. त्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली पण त्यावेळी देशाची परिस्थिती खूप बिकट होती.भारत पाकिस्तानचे युद्ध झाले होते.लोकसभेत काँग्रेसचे संख्याबळ घटले. त्यामुळे पक्षातील सिंडिकेट नेत्यांनी उचल खाल्ली. पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपल्या इच्छेप्रमाणे कारभार करावा असे त्यांना वाटत होते. त्यामुळे इंदिरा गांधी आणि त्यांच्यात वाद होऊ लागले त्यातूनच काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. जेष्ठांची सिंडिकेट विरुद्ध तरुणांची इंडिकेट असा उभा संघर्ष झाला. काँग्रेसमधील तरुण नेत्यांनी इंदिरा गांधी यांना साथ दिली. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी सिंडिकेटचे उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांचा पराभव करुन व्ही व्ही गिरी यांना राष्ट्रपती बनवले. सिंडिकेटचा दारुण



पराभव झाल्याने इंदिरा गांधी सामर्थ्यवान बनल्या. मंत्रिमंडळात त्यांनी बदल केले. उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याकडील अर्थखाते त्यांनी स्वतःकडे घेऊन मोरारजी देसाई यांना बाहेरचा रस्ता दाखवला. त्यानंतर त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, संस्थांनीकांचे तनखे रद्द करणे असे निर्णय घेऊन त्यांनी खळबळ उडवून टाकली त्यांच्या या धाडसी निर्णयाला अनेकांनी विरोध केला पण आपल्या निर्णयापासून त्या तसूभरही मागे हटल्या नाही. १९७१ साली झालेल्या मुदतपूर्व निवडणुका त्यांनी एकहाती जिंकल्या. यानिवडणुकीत त्यांनी गरिबी हटाव ही घोषणा दिली. त्यांची ही घोषणा खुप गाजली. याचवेळी पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान यांच्यात मोठा संघर्ष सुरू झाला. पूर्व पाकिस्तानातून एक कोटी निर्वासित भारतात आले. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर ताण पडला. पूर्व पाकिस्तानला भारत मदत करीत आहे म्हणून पश्चिम पाकिस्तानने भाराताविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने भारताला धमकी देत त्यांचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरात पाठवले पण त्या घाबरल्या नाहीत त्यांनी जनतेला आणि सैनिकांना विश्वास दिला या विश्वासाच्या जोरावरच भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला आणि बांगलादेश नावाचे नवे राष्ट्र उदयास आणले. पाकिस्तानचे एक कोटी सैनिक भारताला शरण आले. यावेळी त्यांनी दाखवलेल्या धाडसाची आणि नेतृत्वगुणाची जगाने दखल घेतली. जागतिक राजकारणातील एक सामर्थ्यशाली नेत्या म्हणून त्या उदयास आल्या. देशातही त्यांची लोकप्रियता शिखरास पोहचली. विरोधी पक्षनेते अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांना दुर्गेची उपमा दिली. १९७५ साली त्यांनी सिक्कीमचे भारतात विलीनीकरण केले तर १९७६ साली अणुस्फोट करुन देशाला अणुऊर्जेत स्वयंपूर्ण बनवले. २६ जून १९७५ रोजी त्यांनी देशावर लादलेली आणीबाणी मात्र लोकांना रुचली नाही त्यामुळे १९७७ साली झालेल्या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला पण तीन वर्षाने १९८० साली त्या बहुमताने विजयी झाल्या. १९८४ साली पंजाबमधील पवित्र सुवर्ण मंदिरात खलिस्तानवादी अतिरेकी ठाण मांडून बसले होते. देशाची दुसरी फाळणी करुन स्वतंत्र खलिस्तान देश निर्माण करणे ही त्यांची मागणी होती त्यांचा जर लवकर बिमोड केला नाही तर देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला मोठा धोका आहे हे ओळखून या अतिरेक्यांना सुवर्ण मंदिरातून हुसकावून लावण्यासाठी ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. हा निर्णय घेऊ नये असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला या मोहिमेमुळे अतिरेकी त्यांचा जीव घेण्यासही मागे पुढे पाहणार नाहीत असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला पण देशाच्या अखंडतेसाठी त्यांनी हा निर्णय घेतला. सुवर्ण मंदिरात ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबवून अतिरेक्यांना बाहेर काढण्यात आले. अनेक अतिरेक्यांचा खात्मा करण्यात आला. भिंद्रनवाले हा अतिरेकी या कारवाईत मारला गेला. या मोहिमेने दुखावलेल्या त्यांच्या अंगरक्षकानींच ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्यावर गोळीबार केला त्यात त्यांचा दुःखद अंत झाला. त्यांच्या मृत्यूने भारतातच नव्हे जगात शोककळा पसरली.

# बाप बापच असतो...!



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**जिवनात बापाचे स्थान खुपच महत्त्वाचे आहे. जे आपण शब्दांत मांडू शकत नाही आणि भावनेतून व्यक्त करू शकत नाही. बापाला समजण्यासाठी केवळ बापाला मनापासून मनापर्यंत समजून घ्यावे लागते. थोडक्यात बापाला फक्त फिल करावे लागते तरच बापाचे महत्त्व कळते. मायबाप हे जिवनातील सर्वश्रेष्ठ गुरु तर आहेतच परंतु तेच जिवनाचे खरे शिल्पकार असतात. आज पर्यंत आईवर खुप काही लिहले गेले, गायले गेले. महती सांगताना बाप जरा दुर्लक्षित राहीला. परंतु मायबापा च्या प्रेमामध्ये माय आणि बाप वेगळे करताच येत हळव्या मनाची आई आपल्या आपल्यावर प्रेम करताना दिसते, हळव्या मनाची आई आपल्या बाजुने बोलताना दिसते, हळव्या मनाची आणि आपल्या पाठीशी उभी राहताना दिसते.**

हळव्या मनाची आई आपल्यासाठी काही करताना दिसते परंतु बापाकडे बघण्याचा व काही साहित्यामध्ये वर्णन केल्यानुसार बापाला कठोर मन, घट्ट मनाचा दाखवले गेले परंतु मुळात बाप तसा नसतोच. कारण बाप समजून घेताना आपण बापाच्या भावना समजून घेत नाही म्हणून बाप आपल्याला कठोर वाटतो. मायबाप दोघही आपल्याला घडवतात. दोघांचाही मोठा वाटा आपल्या जिवनामध्ये आहे. दोघांनीही आपल्या सोबत सारखेच वागले तर बँलन्स होणार नाही. म्हणून माय मयाळू व बाप कठोर मनाचा वाटतो. परंतु खरं तर आपल्याला जिव लावणाऱ्या मायला व आपल्याला सांभाळून घेणारा बापच असतो. माय जेव्हा आपल्या पाठीशी उभे राहताना दिसते तर तीला उभे राहण्यासाठी बापाचाच आधार असतो हे आपल्याला दिसत नाही, आपल्या बाजूने बोलणारी माय बघताना बाप कोणासाठी एखादी गोष्ट नाकारतो याचा कधी आपण शोध घेतच नाही. म्हणून बाप समजायला जरा वेळच लागतो. बाप हा नारळा सारखा असतो. वरून टनक, कठोर वाटत असला तरीही आपण बापाला समजून घेतले तर खऱ्या अर्थाने गोबऱ्या सारखा नरम व गोड बाप असतो, पाण्यासारखा नितळ बाप असतो. बापही आपल्या जिवनाचा तेवढाच शिल्पकार असतो जेवढी माय दिसते. दोघांमध्ये एकच फरक आहे. मायचे प्रेम लवकर दिसते आणि बापाचे प्रेम समजून घ्यावे लागते. आपल्या अडचणी मध्ये माय आपल्याला पैसे देताना आपली गरज पुर्ण करताना दिसते. परंतु यायच्या हातात पैसे, आणि आपली गरज पुर्ण करण्याची ताकद बापच निर्माण करुन देतो. जोपर्यंत मायच्या हातात बाप पैसे देत नाही तोपर्यंत बापाला झोप लागत नाही. जेव्हा आपण झोपतो तेव्हा बाप आपला विचार करून रात्रभर जागतो आणि आपली अडचण दुर करण्यासाठी दिवसभर मेहनत करून हळद आईच्या हातात पैसे देतो हे आपल्याला बापाला समजून घेतल्या शिवाय कळत नाही. बाप बापच असतो कधी कधी कठोर वाटणाऱ्या बापाचे शब्द आपल्याला टोचतात, झोंबतात आणि तेव्हा लगेच बापा विषयी मत बनवून बरेचजण बापाला बोलत नाहीत. बापाच्या कष्टाचे खातात, बापाच्या घरात राहतात पण बापाला बोलत नाहीत कारण त्यांनी फक्त बापाने बोललेले शब्द लक्षात ठेवले असतात, त्या मागचा उद्देश मात्र कधीच लक्षात घेत नाही. जेव्हा आपण एखाद्या अडचणी मध्ये असतो तेव्हा सर्वात जास्त दुःख बापाला होत असते. परंतु बापाने जर दुःख दाखवले तर हळवी माय खचुन जाईल आणि मुलाच्या मनात काय विचार येईल याच विचाराने बाप स्वतः ला मजबूत करण्याचा प्रयत्न करत असतो. फाटका जोडा, फाटके बनियान, थिगळाचे शर्ट घालणारा बाप लेकराला मात्र रफ्फु केलेली पँटही घालण्याची वेळ येऊ नाही म्हणून राबत असतो. खरं तर आपण केवळ बापामधला कठोरपणा बघितला असतो. परंतू बापाच्या भावना बघितल्या तर डोळ्याला धारा लागत लागतात. कारण मायबापाचे प्रेम हे पैशात संपती मध्ये काय कोणत्याही मापात मोजता येत नाही. बापाची भूमीका व मन समजायला बराच वेळ निघून जातो तरीही बाप बऱ्याच वेळा कळत नाही. कारण बऱ्याच वेळा आपण बापाकडे बाप म्हणून पाहत नाही. बापाकडे बाप म्हणून पाहिले तर बापाची महती, मेहनत व आपल्या आयुष्यातील स्थान कळते. म्हणून मायबाप समजून घेतांना त्यांचे मन, भावना व भुमीका हे सर्व समजून घ्यावे लागते. बऱ्याच वेळा फाटक्या कपड्याने बाप मेहनत करतो आपल्याला शिकवतो, बापामुळे चांगले कपडे घालतो. परंतु सार्वजनिक ठिकाणी बापा सोबत जायची बऱ्याच मुलांना लाज



वाटते. पण बापाच्या आयुष्यातील सर्वात मोठा आनंदाचा क्षण हा बापाला तुम्ही केवढ्या घरात ठेवता, केवढ्या गाडीत फिरवता, काय घाऊ घालता यात मुळीच नाही. बापाचा सर्वात मोठा आनंद असतो जेथे आपल्याला थोडा फार मान सन्मान आहे त्या ठिकाणी तुम्ही बापाला कोणते स्थान देता, बाहेर च्या जगात बापाचे महत्त्व कसे सादर करता यावर बापाचे सुख अवलंबून असते. सगळ्याच बापा प्रमाणे माझाही बाप हा मेहनती, कष्टाळू व माझ्या इच्छा पुर्ण करणारा होता. जो पर्यंत बापाकडून मेहनत झाली तोपर्यंत बापाने कशाचीच कमी पडू दिली नाही. बाप अल्प शिक्षीत असुनही शिक्षणासाठी पुरेपूर मदत केली. मोलमजुरी करणाऱ्या बापाने श्रीमंत लोकांच्या लेकरा प्रमाने शिकवले, स्वतः अडचण भोगली पण मला गरिबीचे व मोल मजुरी केल्याचे चटके लागु दिले नाही. त्यांने अनेक दिवस एकेका कपड्याच्या जोडीवर काढले परंतु मला कधीच कपड्याची अडचण येऊ दिली नाही. तिन बहीनभाऊ, बहीनीचे शिक्षण, लग्न, माझे शिक्षण व घर मायबापाने स्वतः च्या मेहनतीवर पुर्ण केले. बापाची एकच ईच्छा फक्त मी जे कष्ट सोसले ते कष्ट माझ्या लेकराला सोसण्याची वेळ येऊ नये. म्हणून सतत राबणारा बाप. समाजात वावरताना चुकीचे काम हातातून होणारच नाही अशी शिकवण देऊन स्वाभिमान देणाऱ्या बापाने सामाजिक व नैतिक संस्कार देखील केले. बऱ्याच वेळा मला प्रश्न पडत होता, बाप एवढे आपल्या साठी करतो तर बापाला आपल्या कडून काय अपेक्षा आहेत. याचे उत्तर मला सापडेना आणि बापाला विचारण्याची हिंमत होईना. बापाने एवढे शिकवले पण बापाला कधीच शाळेत नेले नव्हते. परंतु कॉलेज च्या काळात पालक मेळावा होता. सर्व विद्यार्थांचे पालक येणार होते. यापुर्वी ही अनेक पालक मेळावे झाले परंतु कधीच बापाला मेळाव्यात नेले नाही. कारण बापाने शिक्षणासाठी दुर पाठवले पण बापाला एका दिवसासाठी दुर बोलवणेही योग्य वाटत नव्हते. परिस्थिती हलाखीची होती. काही गोष्टी ची जाणीव होत होती. परंतु एकदा कॉलेज मधील प्राध्यापक, मित्र मैत्रीणी यांनी पालक मेळाव्यात वडिलांना घेऊन येण्याचा आग्रह केलाच. तेव्हा वडीलांना तेथे घेऊन गेलो. साध्या राहणीमानात बाप आला. पहिल्याच वेळी बाप आपल्या शैक्षणिक ठिकाणी आल्याने बापाची नेमकी काय अपेक्षा होती तेही कळत नव्हते. परंतु जसाही मी बापाला घेऊन कॉलेज परिसरात गेलो आणि प्राध्यापक, मित्र मैत्रिणी यांना जसे माहिती झाले तेव्हा पासून तर कार्यक्रम होईपर्यंत माझी आणि बापाची भेट झाली नाही. एवढा जिव प्राध्यापक व मित्र मैत्रीणींनी लावला होता. जेवना साठी बुफे असुनही बापाला सर्व एका जागेवर जेवन मिळत होते. अनेक पालक असुनही संस्थाध्यक्ष वडिलांना बोलत होते. बापानी त्यांच्या मेहनती ने मला शिकवले आणि माझ्या मार्फत त्यांना जो मान सन्मान मिळत होता. ते बघून बाप खुप भारावून गेला. कार्यक्रम संपल्यावर वर बाप गेला. घरी गेल्यावर बापाने अनेकांना सांगितले ज्या उद्देशाने मुलाला शिकवले तो उद्देश पुर्ण झाला. मुला मुळे मान सन्मान मिळाला. परंतु बापाला मी कस सांगणार जे काही तुम्हाला मिळाले ते सर्व तुमचे संस्कार, शिकवण व मेहनत आहे. मी फक्त माध्यम आहे.

माय पण खुश झाली. बापाला गर्व निर्माण झाला. आणि बापाच्या चेहऱ्यावर वेगळीच चमक दिसली. तिच चमक आयुष्यभर ठेवण्यासाठी वाटेल ते करण्याचा निर्णय घेतला. परंतु निसर्गाने साथ दिली नाही. बापाने जेवढे कष्ट, मेहनत माझ्या साठी घेतली आणि माझा सांभाळ केला तेवढा सांभाळ मला वडीलांचा करता आला नाही. कमी वयात बापाचे अकस्मात निधन होऊन बापाने पोरके केले. बाप नावाचा आधार गेला. बाप नावाचा आधार गेल्याने कौतुकाची थाप पाठीवर कोण ठेवेल. बाप गेल्याने पाठीवर कौतुकाची थाप पडत नाही. काहीतरी हरवल्या सारखे वाटतं. बापाची पोकळी भरून निघु शकत नाही याची जाणीव प्रत्येक ठिकाणी होते. २० नोव्हेंबर ला बापाला जाऊन एक वर्षे पुर्ण होते. परंतु बापाची आठवण क्षणा क्षणाला येते. बापाची सेवा करण्याची एक ईच्छा मनाला स्वस्थ बसु देत नाही. मायबापाची सेवा हेच मुलाचे कर्तव्य असते. बाप गेला पण आईची सेवा नक्कीच होईल. पण बापाने अजून सेवा करण्याची संधी दिली असती तर माझ्या जिवनाचे सार्थक झाले असते. असो. वडिलांची आठवण येतच राहील. वडिलांना प्रथम स्मृतीदिनी वंदन. आणि मायबापाची सेवा करून त्यामध्ये कधीच भेद करू नये हिच अपेक्षा. कारण बाप हा बापच असतो. त्यांना समजून घेणे आवश्यक असते.

# संडास नाही घरीदारी: हो, तेथे देऊच नका पोरी!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतात मोठमोठ्या देवालयापेक्षा शौचालयांची अत्याधिक आवश्यकता भासत आहे. आज भारतात कित्येक स्त्री-पुरुषांना असुविधेमुळे उघड्यावर शौचास बसावे लागते. त्यामुळे रोगराई मोठ्या प्रणावर फैलावते. जेंडर बजेटमध्ये लाखोंची तरतूद होऊनही कधी प्रशासनाची टाळाटाळ तर कधी वित्तीय संकटामुळे लोक शौचालय बांधत नाहीत. ही महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारतासाठी दुर्दैवी बाब ती कोणती असू शकेल? संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १९ नोव्हेंबर हा दिवस जागतिक शौचालय दिन म्हणून जाहीर केला आहे.**

जगभर या दिनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे. महाराष्ट्रात सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी गडांगडावर शौचालय बांधले होते. महाराष्ट्र संताची भूमी आहे. अनेक थोर महात्मे महाराष्ट्रात घडून गेले आहेत. त्यापैकीच एक संतश्रेष्ठ गाडगेबाबा होते. स्वच्छतेचे महत्त्व सर्वप्रथम त्यांनी समाजाला पटवून दिले. त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन रस्त्यावरची घाण साफ केली. रात्री किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील धूळ, घाण, कचरा साफ केले. ते खरे स्वच्छतादूत व स्वच्छतेचे पुजारी होते. बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींचा हा लेख जरूर वाचा... संपादक._

आज पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया नियोजित व अनियोजित क्षेत्रात काम करू लागल्या आहेत. मंदिरे, धार्मिक स्थळे, मार्केट, विविध वस्तू विक्रीचे रोड मार्केट, बाजार अगदी, रांगोळीपासून ते अनेकविध वस्तू विक्रीसाठी स्त्रिया घरापासून तास न् तास दूर राहतात. तेव्हा मलमूत्र विसर्जनाची गरज भागणार कशी? किती व कशी सोसायची ही हालअपेष्टा? ती मूलभूत गरजांपासून इतकी उपेक्षितच असू नये. निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांसाठी प्रसाधनगृह हेसुद्धा स्वच्छ भारत अभियानात आवर्जून समाविष्ट झाले पाहिजे. उघड्यावर मलमूत्र विसर्जन आणि ते दाबून, कुचंबून ठेवणे, आरोग्यास किती हानीकारक? स्त्रियांचे आरोग्य व शारीरिक सुदृढता महत्त्वाची, तसेच मानसिक कुचंबणा टाळणे मोलाचे म्हणून स्त्रियांसाठी घरीदारी प्रसाधनगृहे हवीच आहेत. ती तशी सार्वत्रिक हवी. सार्वजनिक व कौटुंबिक स्तरावर प्रथम प्राधान्याने प्रसाधनगृहे उभारावीत. त्यातच शौचालय नसल्याने स्त्रियांच्या मासिक धर्माच्या काळात किती हाल होतात? ते विचारूच नका. म्हणे, आपण आता प्रगतशील अर्थव्यवस्थेच्या टप्प्यावर आहोत. प्रगत, आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान, विकासाचे टप्पे पार करताना स्त्री प्रसाधनगृहाचा विषय इतका गंभीर असू नये, ही थोडी थोडकीच लज्जास्पद बाब असेल का?

विश्व मलमूत्र विसर्जन व्यवस्थापन दिन- जागतिक शौचालय दिन ही नैसर्गिक गरज आहे. आरोग्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व वारंवार अधोरेखित केले जाते; पण ती उघड्यावर करण्याची क्रिया नसून त्यासाठी प्रसाधनगृह हवे, हे मान्य असूनही त्याबाबत प्रचंड अशी उपेक्षा व स्त्री प्रसाधन गृहाकडे तर नको तितके दुर्लक्ष होत आहे. शासनाने स्वच्छ भारत अभियान सुरू केले; मात्र माणसाच्या मलमूत्र विसर्जनासाठी बंदिस्त सोय असण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. शरीर जीवनशैलीची ही अविभाज्य अशी प्रक्रिया होय. तो संवेदनशील असा विषय आहे. उघड्यावर मलमूत्र विसर्जन करणे सार्वजनिक अनारोग्याला, साथीच्या रोगांना निमंत्रणच जणू काही! हा दिन मलमूत्र विसर्जनाचे व्यवस्थापन व देशापुढील आरोग्याशी निगडीत आहे. त्याबद्दलची अनास्था, उपेक्षा आणि योग्य ती दखल घेण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष, अशी स्थिती आज आपल्या समाजात विशेषतः ग्रामीण निम्नशहरी भागात आहे, हे दुर्दैव होय. १९ नोव्हेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघातर्फे जागतिक शौचालय दिन म्हणून जाहीर करण्यात आला आहे. या दिवशी स्वच्छतेचे महत्त्व पटवून घ्यावे व द्यावे. नैसर्गिक गरज भागविली जावी, म्हणून या दिनाचे प्रयोजन करण्यात आले.

विश्व प्रसाधनगृह दिन हा आपल्याला आपल्या जीवनात



स्वच्छता किती महत्त्वाची आहे, याची आठवण करून देतो. आपल्या परिसरातील स्वच्छता व्यवस्था सुधारण्याचे अनेक मार्ग आहेत आणि आपण त्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जागतिक शौचालय दिवस जसजसा जवळ येत आहे, तसतसे आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की ज्यांना अस्वच्छ सांडपाणी व्यवस्थेचे विविध धोके माहित नाहीत त्यांना सांगणे आवश्यक आहे. मानवी कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून त्यातून कोणतेही आजार होऊ नयेत. मानवी कचऱ्याचे कंपोस्ट खत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण कचऱ्यामुळे अनेक गुंतागुंती निर्माण होतात. या दिवसांत ग्रामीण भागात राहणाऱ्या अनेक लोकांपर्यंत पोहोचण्याची आणि त्यांना शौचालये आणि स्नानगृहे बांधण्यासाठी मदत करण्याची गरज आहे. योग्य स्वच्छता व्यवस्थेशिवाय असे लाखो मार्ग आहेत, ज्याद्वारे रोग पसरू शकतात. जागतिक शौचालय दिनाचे मुख्य उद्दिष्ट आहे, की या रोगांवर कोणत्या मार्गांनी सामना केला जाऊ शकतो, यावर चर्चा करणे होय. भारतात मोठमोठ्या देवालयापेक्षा शौचालयांची अत्याधिक आवश्यकता भासत आहे. आज भारतात कित्येक स्त्री-पुरुषांना असुविधेमुळे उघड्यावर शौचास बसावे लागते. त्यामुळे रोगराई मोठ्या प्रणावर फैलावते. जेंडर बजेटमध्ये लाखोंची तरतूद होऊनही कधी प्रशासनाची टाळाटाळ तर कधी वित्तीय संकटामुळे लोक शौचालय बांधत नाहीत. ही महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारतासाठी दुर्दैवी बाब ती कोणती असू शकेल? सुज्ञ पालकाने आपली लाडकी मुलगी संडास नसलेल्या घरी मुळीच देऊ नये. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १९ नोव्हेंबर हा दिवस जागतिक शौचालय दिन म्हणून जाहीर केला आहे. जगभर या दिनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे. महाराष्ट्रात सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी गडांगडावर शौचालय बांधले होते. महाराष्ट्र संताची भूमी आहे. अनेक थोर महात्मे महाराष्ट्रात घडून गेले आहेत. त्यापैकीच एक संतश्रेष्ठ गाडगेबाबा होते. स्वच्छतेचे महत्त्व सर्वप्रथम त्यांनी समाजाला पटवून दिले. त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन रस्त्यावरची घाण साफ केली. रात्री किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील धूळ, घाण, कचरा साफ केले. ते खरे स्वच्छतादूत व स्वच्छतेचे पुजारी होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र म्हणजे स्वच्छ अशा बंदिस्त संडासमध्ये मलमूत्र विसर्जनाची व्यवस्था असणे होय. परंतु सुमारे ४० टक्के लोकांना शौचालयाची सुविधा नसणे वा त्याचा वापर न करणे अशी स्थिती आहे. सरकारी आकडेवारीनुसार देशात ११० दशलक्ष शौचालयांची गरज आहे. ग्रामीण निम्नशहरी भाग, झोपडपट्टी, जुन्या वसाहती, डोंगर भागात वाड्या-वस्त्या वगैरेमध्ये शौचालयाची उपलब्धता नाही. उघड्यावर शौचास बसणे, हाच शिरस्ता आजतागायत चालू आहे. पाणंद, ओढा, नदी, टेकडी, झाडे-झुडपे वगैरेचा आधार घेत स्त्रिया मलमूत्र विसर्जन करतात. पुरुष समोर दिसला, की उभे राहणे हेच अपरिहार्य कर्म झाले आहे. स्त्रियांसाठी शौचालय नसणे, ही अत्यंत अन्यायकारक अनारोग्यी बाब होय. शहरी भागात कॉमन शौचालयाची व्यवस्था असते, तीही अपुरी व अस्वच्छच. त्यातच स्त्रियांच्या स्वभावानुसार त्या रांगेत उभे राहण्यास टाळाटाळ करतात. शिवाय सकाळी कामाची गडबड असते. मग ही नैसर्गिक गरज कुचंबून मारली जाते. त्यात आजारग्रस्त स्त्रिया, गरोदर माता, तरुण मुली यांची तर फारच गैरसोय होत आहे. ग्रामीण परिसरांमध्ये पारंपारिक मलनिस्सारण पद्धतीकरिता होणारी मोठी भांडवली गुंतवणूक, न परवडणारी देखभाल, व्यवस्थापन खर्च, पाण्याचा अपुरा पुरवठा, विखुरलेल्या वस्त्या व गावे आदींमुळे शक्य होत नाही. शहरी भागात प्रसाधनगृहे वाढत असूनही अक्षम्य असे दुर्लक्ष होत आहे, तेही विशेषतः स्त्रियांसाठी प्रसाधनगृह उभारणीमध्ये. व्यक्तिगत आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता, सामाजिक आत्मसन्मान रक्षण व प्रगतिशील राष्ट्र म्हणवून घेण्याच्या या टप्प्यावर तर सर्वांसाठी प्रसाधनगृहे ही अत्यावश्यक गरज मानली जावी. स्त्री-पुरुष समानता, स्त्रीमुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्या, या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था आदी या समानतेचा लढा देताना शासनावर दबाव टाकण्याचा म्हणूनच प्रयत्न करतात. त्यामध्ये वास्तविक स्त्री प्रसाधनगृहाची नितांत आवश्यकता, हा विषय प्रथम प्राधान्याने घ्यायला हवा. शिवाय जनजागृती, समाजप्रबोधन, कौटुंबिक समुपदेशन, स्त्रीपुरुष समानता विषयक कायदे आणण्याचा लढा देताना स्त्रियांचे मूळ दैनंदिन जीवन जगण्याचे प्रश्न महत्त्वाचे मानून प्राधान्य द्यायला हवे. समानतेचा नारा देताना मुळातच स्त्री जीवन सुसह्य, सोसीक व सुखावह कसे होईल, हे पाहायला हवे. त्या दृष्टीने स्त्री प्रसाधनगृह हा प्रश्न मोलाचा आहे, याचे भान त्या चळवळीने व शासनानेसुद्धा ठेवावे, ही अपेक्षा!

# चला, आपणच आपलं जगणं समृद्ध करूया



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**जगतो तर आपण सगळेच. पण हे जगणं केवळ स्वतःपुरता झालंय आताशा. खरंतर आपण खरंच जगतोय का? अस प्रश्न मला नेहमीच पडतो. जेव्हा मी माझ्या चहूबाजूला बघतो. अस जाणवतं की आपण ना आपल जगणंच विसरलोय. आपण फक्त रोजचा दिवस पुढे ढकलतोय. उद्या छान जगू या आशेवर, या विचारावर. आणि दुसरं सगळ्यात महत्वाचं म्हणजे आपण ना सगळे स्पर्धेच्या युगात धावतोय. आपले स्वप्न पुर्ण करण्यासाठी ..... फक्त सतत धावणं चाललंय. आणि या धावण्याच्या स्पर्धेत आपण आपलं आयुष्य समृद्ध करणं जवळ जवळ विसरूनच गेलोय. भौतिक सुख , समृद्धीच्या लालसेत आपण मानसिक शांती , समाधान आणि आपल्याच हातात असलेलं आपलं समृद्ध जगणं आपण गमावून बसतोय.**

आपला आनंद आपणच शोधत फिरतो आहे इकडे तिकडे,आज काय तर आय फोन हवा , उद्या काय तर फोरव्हिलर हवी , परवा काय तर नविन फ्लॅट घ्यायचाय किंवा ज्यांच घर आहे त्यांना घराचं रंग रुप पालटून विन लुक द्यायचाय. कुणाला मॉड्युलर किचन करायचंय तर कुणाला टूरवर जायचंय. मग यासाठी हवाय पैसा मग तो जमवायला आपण पळतोय अक्षरशः पळतोय . बर हल्ली घरात दोघही कमावणारे. त्यामुळे तू ईएमआय भर. मी घरातलं बघते अशी वेल अंडरस्टॅन्डिंग चाललीय. आणि हे मिळवण्यात आणि हे सगळं करण्यात आपण दिवसाचे कित्येक तास घराच्या बाहेरच राहतोय. ना मुलांना वेळ देणं ना स्वतः आयुष्याचा आनंद घेणं. आपल्या आजूबाजूला कोण राहतंय हे सुद्धा हल्ली कुणाला माहीत नसतं. फ्लॅट स्किम आल्यापासून सताड उघडी राहणारी घराची दारं कायम बंद राहायला लागलीय. एकमेकांचा संपर्कच हल्ली इतका कमी झालाय की संवाद आणि कौटुंबिक संबंध हे तर दुरंच. खूप जास्त कुणाशी लावून घ्यायचं नाही , त्यांच ते पाहतील आपल्याला काय ? आपण नको त्यात पडायला . ही वृत्ती आता सरसकट सर्वत्र बघायला मिळतेय. यामुळे एकमेकांसोबत निर्माण व्हायला हवेत असे सौहार्दपूर्ण संबंध अलिकडे दिसत नाहीत. कामापुरता काम बस इतकं आपण संकुचित विचारांचं होत चाललोय. यामुळे होतंय काय की एकमेकांसोबत बोलल्याने होणारा भावनांचा निचरा , सहज डोळ्यातून ओघळणारे अश्रू , मनावरचा हलका होणारा ताण , मनसोक्त खळखळून हसणं , एकमेकांची टिंगल टवाळी करत केलेली मस्ती , सहज म्हणून एकत्र होणारा नाश्ता , जेवण , छोट्या छोट्या सहली हे सगळं सगळं हळुहळू करत बंद होत चाललंय. आणि मग यामुळे नैराश्य , नकारात्मक विचारांचा भडिमार , डिप्रेशन, मनावरचा ताण हलका न झाल्याने वाढलेले हार्ट अॅटॅक, ब्रेन हॅमरेज, खळखळून न हसल्याने किंवा हमसूनहमसून न रडल्याने वाढणारं ब्लड प्रेशर, तणावातून निर्माण होणारी शुगर असे विविध आजार आज आपल्या घरात सहज प्रवेश करू लागले आहेत. आनंदाचं जणू आपण आपल्या घरात प्रवेश निषेधच करून ठेवला आहे.आणि म्हणूनच मग मला अस वाटतं की, आपणच आपलं आयुष्य समृद्ध करू शकणार नाही का ? तर यावर माझं उत्तर आहे हो... आपणच आपलं आयुष्य समृद्ध करू शकतो. गरज आहे ती फक्त सकारात्मक विचारांची, दिशा बदलण्याची आणि जगण्याची पद्धत थोडी बदलण्याची . बघा पटतंय का . आपण पुन्हा नव्याने जगणं सुरु करू शकतो. आणि तेही आनंदात....सगळ्यात पहिले तर आपल्याला आपल्या कुटुंबाला वेळ द्यायचाय. शक्यतो संध्याकाळी जेवण सोबत करणे , रविवार ला किंवा सुट्टीच्या दिवशी डब्बा पार्टी करायला जवळच कुठेतरी जाणे , आपण सण- समारंभ आपण आपल्या पद्धतीने सर्व कुटुंबातील सदस्य एकत्र येत साजरा करणे , वाढदिवसाला देवळात जाणे , मित्रपरिवाराला घरीच फराळ / जेवणाला बोलवणे , शक्यतो सगळे मिळून स्वयंपाक करणे , आठवड्यातून एक दिवस आपण मानतो त्या देवाच्या देवळात जाऊन आरती करणे , रात्री जेवणानंतर सोबत शतपावली करणे , कधीतरी सहजच थर्मास मधे कॉफी घेऊन पतिपत्नी गाडीवर लाँग ड्राईव्ह करत जाणे. मधेच कुठेतरी रम्य परिसरात थांबून कॉफी पिणे, वेळ मिळेल तेव्हा आपल्याच स्लॅबवर बसून मावळतीचा सुर्य किंवा रात्री आकाशातील चांदणे पाहणे, सणावाराला खरेदीला जातांना सोबत जाऊन खरेदी करणे या छोट्या छोट्या गोष्टींसाठी फारसा पैसा लागत नाही पण यातून मिळणारा आनंद आयुष्य नक्कीच द्विगुणित करतो हे तेवढंच खरंय. घरी जागा असेल तर लहान लहान झाडं लावणे , त्याचं संगोपन करणे , स्लॅबवर कुड्यांमधे झाडं लावणे , त्याला पाणी घालणे आणि ते वाढतांना पाहणे , फुलतांना पाहणे यासारखा आनंद नाही. याला कितीसा पैसा लागणार ?? मित्रपरिवारासोबत वेळ अवश्य घालवा. हे संजीवनीचं काम करतात आपल्या आयुष्यात . तुमचे दुःख , अडचणी , कटकटी हे मित्रच सहज दुर करतात. शक्य असल्यास रोज रात्री , किंवा आठवड्यातून एकदा तेही शक्य नसेल तर किमान महिन्यातून एकदा तरी मित्रांसोबत गप्पा नक्कीच मारा. आणि हो , भटकंती सारखी मनाची विश्रांती नाही. म्हणून वेळ मिळेल तेव्हा जस जमेल तस सहज म्हणून फिरायला अवश्य निघत जा. बाहेरगावीच गेलं पाहीजे अस काही नाही. गावातल्या गावातही आपण निवांत भटकू शकतो. फिरण्यानी आयुष्य समृद्ध होत म्हणतात. आणि म्हणूनच , चला तर मग आपणच आपल आयुष्य, आपल जगणं समृध्द करूया...

# महावितरण कंपनीतील लाईनमॅनसह इतर रिक्त पदे भरा : आ. किशोर जोरगेवार



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विज ही मानवी गरज बनली आहे. त्यामुळे विज पुरवाठा करणा-या यंत्रणेची जबाबदारी वाढली आहे. अशात आपण उत्तम सेवा देण्यासाठी तत्पर असल पाहिजे. महावितरणमध्ये लाईनमॅनसह इतर अनेक पदे रिक्त आहे. त्यामुळे ही पदे तात्काळ भरल्या गेली पाहिजे अशा सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे. महावितरण कार्यालय येथे एमएसईबी सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांच्या प्रमूख उपस्थितीत महावितरण, महापारेषण, महानिर्मिती व महाऊर्जा या सरकारी कंपन्यांच्या जिल्हा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीला राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, महानिर्मितीचे संचालक संजय मारूडकर, कार्यकारी संचालक पंकज सपाटे, महावितरणचे मुख्य अभियंता सुनील देशपांडे, महानिर्मितीचे मुख्य अभियंता गिरिश कुमारवार, महापारेषणचे मुख्य अभियंता सतीश अणे उपस्थित होते.

चंद्रपूर हा विज उत्पादक जिल्हा आहे. त्यामुळे येथील वीज सेवा उत्तमच असली पाहिजे. विज ग्राहकांशी आपली वागणूक सौजन्यपूर्ण असली पाहिजे. त्यांच्या अडचणींचे निराकरण तात्काळ करण्यासाठी आपण प्रयत्नशील असल पाहिजे. कमी मनुष्यबळ असूनही चांगली सेवा देण्यासाठी महावितरण ओळखली जाते. आपण निर्माण केलेली ही ओळख कायम ठेवण्यासाठी परिश्रम घ्या. येथे अनेक पदे रिक्त आहेत. यात विद्युत सेवेचा मुख्य भाग असलेल्या लाइनमॅनचे जवळपास 50 हुन अधिक पदे रिक्त आहेत. ती भरण्याच्या दिशेने तातडीने प्रयत्न व्हावेत अशा सुचनाही या बैठकीत बोलाताना आमदार किशोर जोरगेवार यांनी संबंधित अधिका-यांना दिल्या आहेत. वडगाव प्रभागात विद्युत पुरवठा अपुरा पडत आहे. त्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेता वडगाव येथे सब स्टेशन सुरु करण्याच्या सुचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे. सध्या विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार कमी झाले आहे. हे नक्कीच महावितरणचे यश आहे. मात्र विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी लागणारा कालावधी आणखी कमी करता येईल या दिशेने आपले प्रयत्न असले पाहिजे असेही ते यावेळी म्हणाले. विद्युत शॉक लागण्याच्या घटनांवर अद्यापतरी आपण पुर्णतः अंकुश मिळवू शकलेलो नाही त्यामुळे आता विद्युत शॉकवर अंकुश लावण्यासाठी प्रत्येक विद्युत ग्राहकांकडे सुरक्षा यंत्र महावितरणने स्वखर्चातून लावण्याच्या सुचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे.




# मुख्य बाजारपेठेमध्ये मार्केटमध्ये वाहतूक कोंडी


आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ता.खुलताबाद येथील मुख्य बाजारपेठेमध्ये मार्केटमध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहन चालक आपली वाहने रस्त्यावरच उभी करत असल्याने या ठिकाणी दररोज वाहतूक कोंडी होते आणि त्यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे बाजार सावंगी हे 30 ते 35 खेडे लागून असलेले मुख्य बाजारपेठेचे गाव असून शुक्रवारी या ठिकाणी आठवडे बाजार भरतो आणि शुक्रवारी दिनांक 17 नोव्हेंबर रोजी आठवडे बाजार आणि त्यातच दिवाळीचा सणाचा दुसरा बाजार होता त्यामुळे आज येथे अधिकच वर्दळ होती आणि त्यात रस्त्यावर दोन्ही बाजूने वाहन चालकांनी आपल्या दुचाकी उभ्या केल्याने वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी झाली आणि या मार्गावरून बाजारपेठेतून कन्नड फुलंब्री बस जात असताना बस जाण्याला रस्ता मोकळा नसल्याने बस चालकाला बस उभी करून स्वतः खाली उतरून रस्त्यातील दुचाकी बाजूला कराव्या लागल्या आणि स्वतः वाट काढावी लागली.बस चालक यांनी याविषयी नाराजी व्यक्त केली.असा प्रकार घडल्यामुळे नागरिक या ठिकाणी नाराजी व्यक्त करत आहेत. आणि जे वाहनचालक रस्त्यावर आपली वाहने उभी करतात त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी अशी मागणी करत आहेत.

# दिवाळीची सुटी, पर्यटकांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** दिवाळीची सुट्टी बघता वेरुळ लेणी येथे पर्यटकांची प्रचंड गर्दी फुलली होती तर वहाने थांबविण्यासाठी थांबा (पार्किंग) नसल्याने मुख्य रस्त्यावर दुतर्फा रांगा व रस्त्यात आडवे तिडवे वाहने त्यामुळें पर्यटकांना प्रचंड मनस्ताप सहन करावे लागत असल्याचे चित्र होती. सध्या दिवाळीच्या सुट्ट्या सुरु असल्याने छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यासह देशातील राज्याच्या कानाकोपऱ्यातून वेरुळ येथे लेणी, खुलताबाद येथे भद्रा मारुती, जर जरी जर बक्ष दर्गा, म्हैसमाळ येथे थंड हवेचे ठिकाण निसर्गरम्य परिसर डोंगराळ भाग विविध मंदिर पर्यटन स्थळे बघता जागतिक तथा ऐतिहासिक नामांकित वेरुळ लेणी येथील पर्यटन स्थळे बघण्यासाठी दि.१७ वेरुळ येथे प्रचंड गर्दी पर्यटकांची दिसुन आली. तर पर्यटकांचे वहाने थांबविण्यासाठी थांबा पार्किंग नसल्याने व एमटीडीसी मध्ये ही वहान थांबा बंद झाल्याने पर्यटकांचे प्रचंड हाल झाले.वहान थांबा नसल्याने मुख्य रस्त्यावर दुतर्फा वहानांच्या रांगा लागल्या होत्या वहान लावण्यासाठी जो तो पर्यटक जागा शोधत मिळेल तेथे वहान लावत असल्याने व वहाने आडवे तिडवे उभे करत असल्याने पर्यटकांचे प्रचंड हाल मनस्ताप झाले येथे पोलीस बळ कमी दिसून आले.पोलीस मदत केंद्रासाठी येथे पोलीस बळ संख्या वाढवण्याची मागणी नागरिकांतून होत होती.एमटीडीसी ने वहान थांबा बंद केल्याने खाजगी मालकांची सद्या चांदी होत आहे.तर दिवाळी सुट्टी असल्याने तो पर्यंत वेरुळ येथे असीच प्रचंड गर्दी राहणार असल्याचे चित्र आहे. पोलिस विभागाने येथे पोलीस कर्मचारी बळ वाढवुण पर्यटकांना मदत सहकार्य करण्याची मागणी पर्यटकांनी केली आहे.





# जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे

## विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये. ओबीसी समाजाचे आरक्षण टिकवणे सरकार आणि विरोधी पक्ष यांची सामूहिक जबाबदारी आहे. ओबीसींच्या हक्काचे रक्षण करण्याबरोबरच सर्व समाजाला न्याय देण्याचे काम आम्ही मिळून करू, जीवात जीव असेपर्यंत ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी लढणार,असा विश्वास देत जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. जालना जिल्ह्यातील अंबड येथे झालेल्या एल्गार सभेला संबोधित करताना वडेट्टीवार बोलत होते. यावेळी श्री. वडेट्टीवार भावूक झाले होते. वडेट्टीवार म्हणाले, आजची ही सभा पाहिल्यावर ओबीसींच्या हक्काला धक्का लावण्याची कोणाची हिंमत होणार नाही. ही ऐतिहासिक सभा आहे. ओबीसींच्या हक्कासाठी आम्ही लढत असताना कोणी धमक्या दिल्या तरी आम्ही लढत राहणार. पद येतील जातील. पदापेक्षा समाजातील उपेक्षित वर्गाला न्याय देणे महत्वाचे आहे. ३५० जातीचा समाज कसा जगतो, कोणत्या अवस्थेत जगतो. हे पाहिल्यावर समाजाचे दुःख कळेल. जमिनी कमी झाल्या म्हणणाऱ्यांनी जमिनी नसलेल्या समाजाचा विचार केला पाहिजे.20 एकर,50 एकर जमीन असलेला शेतकरी 5 एकरावर आला असेल, मात्र ज्याला 2 एकर सुद्धा जमीन नाही. तो शेतकरी 20 पिढ्यात कुठे असेल याचा विचार केला पाहिजे. मोठ्या भावाने मोठ्या भावासारखे वागले पाहिजे. दहशत, भीती दाखवून घाबरून सोडणे योग्य नाही. घर जाळण्यापर्यंत टोकाचा द्वेष पसरवला जात आहे. द्वेष आणि विष पेरण्याचे काम कोणी करू नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. वडेट्टीवार म्हणाले, एका छोट्या जातीचा ओबीसी कार्यकर्ता आज समोर आला आहे. मंत्री होतो तरी कधी चिंता केली नाही. आजही चिंता करत नाही. अंबडची ही सभा तुंबड झाली आहे.

# ना. छगन भुजबळ यांच्या गाड्यांसमोर अज्ञातांनी टायर जाळून केला निषेध

आधुनिक केसरी न्यूज



**इगतपुरी :** तालुक्यातील मोडाळे येथे विविध विकास कामांच्या भुमिपुजन व लोकार्पणाच्या कार्यक्रमासाठी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण छगन भुजबळ आले होते. मात्र कार्यक्रम संपल्यावर पुन्हा नाशिकला जात असतांना वाडीव-हे परिसरात काही अज्ञातांनी भुजबळ जात असलेल्या रस्त्यावर टायर जाळून निषेध व्यक्त केला. शुक्रवारी जालना येथे ना छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटलांवर टीका केल्यामुळे मराठा समाज पुन्हा आक्रमक झाले आहेत. कार्यक्रम संपल्यानंतर ना. छगन भुजबळांचा ताफा कार्यक्रमा स्थळापासून ८ किलोमीटर पुढे आल्यावर रस्त्याच्या कडेला शेतात लपुन बसलेल्या काही अज्ञात व्यक्तींनी रस्त्यावर येत टायर पेटवुन भुजबळांचा निषेध व्यक्त केला. तसेच सांजेगाव व भंबाळे फाट्यावर मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी रस्त्यावर जमा होत ना. छगन भुजबळांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करून निषेध व्यक्त केला. मात्र अप्पर पोलीस अधिक्षक माधुरी कांगणे व उपअधिक्षक सुनील भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजु सुर्वे, सहायक पोलीस निरीक्षक समीर बारावकर यांनी चोख बंदोबस्त ठेवल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. येत्या २२ तारखेला इगतपुरी तालुक्यातील शेणीत येथे मनोज जरांगे पाटलांची ११० एकर क्षेत्रावर जाहिर सभा होणार आहे. यामुळे इगतपुरी तालुक्यात वातावरण ढवळुन निघणार आहे.

## बाळासाहेब ठाकरे यांना स्मृतिदिना निमित्त उरण शहरात अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** अखंड हिंदुस्तानचे हिंदुहृदयसम्राट, शिवसैनिकांचे दैवत शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या ११ व्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवार दि. १७ नोव्हेंबर २०२३ रोजी शिवसेना ( श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे गट ) रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर व उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उरण शहर शाखेतर्फे भावपूर्ण आदरांजली वाहून विनम्र अभिवादन करण्यात आले, यावेळी जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर व उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर यांनी शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा दिला. सदर वेळी शहरप्रमुख विनोद म्हात्रे, संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, उपशहरप्रमुख कैलास पाटील, गणेश पाटील, महिला उपजिल्हासंघटिका ममता पाटील, तालुका संघटिका( शहर ) सुजाता गायकवाड, नगरसेविका वर्षा पाठारे, शहर संघटिका वीणा तलरेजा, शहर संघटिका मेघा मेस्त्री, संपर्क संघटिका श्रीमती वंदना पवार, माजी तालुका संघटिका रंजना तांडेल, उपशहर संघटिका माधुरी चव्हाण, हसीमा सरदार, माजी नगरसेवक निलेश भोईर,जेष्ठ पत्रकार घनश्याम कडू, विभागप्रमुख गणेश शेलार, नंदू पाटील, संजय मेश्राम, सर्व आजी-माजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, अंगीकृत संघटनेचे पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.



## १७ वे कविसंमेलन विमला तलाव येथे उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप )व मधुबन कट्टाच्या माध्यमातून महिन्याच्या प्रत्येक १७ तारखेला उरण शहरातील विमला तलाव ( गार्डन ) येथे कविसंमेलन भरविले जाते. या कविसंमेलनात युवक विद्यार्थी यांच्यासह ज्येष्ठांचाही मोठया प्रमाणात सहभाग असतो. १७ नोव्हेंबर २०२३ रोजी विमला तलाव येथे संध्याकाळी ५:३० ते ७ या वेळेत कवी संमेलन मोठया उत्साहात संपन्न झाले. सदर कवी संमेलनाचे अध्यक्ष- प्रा.डॉक्टर साहेबराव ओहोळ तर स्वागताध्यक्ष- भरत पाटील होते. कवितेचा विषय - बोली भाषा आणि आली दिवाळी होता.

या कवी संमेलनात कु.अनुज शिवकर, भगवान म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, संग्राम तोगरे, चंद्रकांत कडू, अजय शिवकर, सी.बी. म्हात्रे आदींनी उत्तम असे कविता सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.या प्रसंगी रायगड भूषण प्रा. एल बी पाटील, ॲड .मच्छिंद्र घरत, सूर्यकांत दांडेकर, डॉक्टर प्रिती बाबरे, मारूती तांबे, चंद्रकांत मुकादम आदि मान्यवर उपस्थित होते. एन. आय. हायस्कूल शाळेचे चेअरमन तथा प्रसिद्ध उद्योजक सदानंद गायकवाड तसेच लायन्स क्लब उरणचे अध्यक्ष तथा एन आय स्कूल (प्राथमिक)उरणच्या मुख्याध्यापिका निलिमा विलास नारखेडे यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी केले. जेष्ठ साहित्यिक एल.बी. पाटील यांनी १०० व्या कविसंमेलना निमित्त राज्य स्तरीय काव्य स्पर्धा घेऊन त्या स्पर्धेत राज्यातील १०० कवींना प्रवेश दिला जाईल.त्याच प्रमाणे लिखित साहित्य मुखपृष्ठ स्पर्धा व उरण कोमसाप काव्य संग्रह/कथा कांदबरी/सामाजिक लेखन पुरस्कार दिले जातील .या बाबत लवकरच अधिकृत निवेदन दिले जाईल. सर्वांना कळविले जाईल असे मत मांडले व कार्यक्रमाचा समारोप केला.

## टिपू सुलतान यांचे बॅनर लावल्याने वाद

### वातावरण खराब होऊ नये म्हणून पोलीस प्रशासन सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आजाद समाज पार्टी तर्फे टिपू सुलतान यांच्या जयंती निमित्त पालिका हद्दीत टिपू सुलतान यांचे बॅनर लावल्याने शहरात मोठा वाद होऊ नये यासाठी पोलीस प्रशासन यांच्या साह्याने तात्काळ बॅनर काढण्यात आले त्या मुळे तेथे मोठ्या प्रमानावर गर्दी पाहायला मिळाली. 20 नोव्हेंबर रोजी टिपू सुलतान यांच्या जयंती निमित्ताने आजाद समाज पार्टीचे आनंद लोंढे व आबा अमृतसागर यांनी धुळे महानगरपालिका हद्दीत पालिका प्रशासनाची परमिशन घेऊन त्या बॅनर संदर्भात पूर्ण महसूल भरून नियमाप्रमाणे बॅनर लावण्यात आले होते परंतु तेथील काही विशिष्ट समाजाने त्या संदर्भात पोलीस प्रशासनाकडे धाव घेत ते बॅनर काढण्यासाठी दबाव टाकण्यात आला व ते बॅनर तात्काळ काढण्यात आले असा आरोप आजाद समाज पार्टी पक्षातर्फे करण्यात आला आहे. या ठिकाणी आनंद लोंढे यांनी सांगितले की त्या बॅनर मध्ये कुठेही अक्षय पार्थ शब्द नव्हते व या लोकशाहीमध्ये इतर महापुरुषांच्या जयंती ना विरोध होत असेल तर हे चुकीचे आहे टिपू सुलतान यांच्या संदर्भात त्यांनी केलेले वाईट कृत्य व एखादी वाईट घटना असेल तर ती माझ्यासमोर आणून दाखवावी व कुठलाही राज्य शासनाचा किंवा केंद्र शासनाचा परिपत्र असेल तर तेही आणून दाखवा तेव्हा कुठलेही बॅनर लावणार नाही असे या ठिकाणी सांगण्यात आले. ह्या लोकशाहीत अशाप्रकारे महापुरुषांसंदर्भात विरोध होत असेल तर आझाद समाज पार्टी तर्फे आम्ही निषेध करतो असे या ठिकाणी सांगितले.

## आ. बागडे यांच्या हस्ते रमेश शिंदे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलात कार्यरत यंत्रचालक रमेश काकासाहेब शिंदे यांना नुकताच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा राज्यस्तरीय 'विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार' मिळाला. त्याबद्दल फुलंब्री मतदारसंघाचे आमदार तथा माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या हस्ते शिंदे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

भारतीय जनता पार्टी तालुका छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमात हा सत्कार करण्यात आला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, उपाध्यक्ष श्रीराम शेळके, तालुकाध्यक्ष राधाकिसन पठाडे, रामूकाका शेळके, माजी महापौर बापू घडामोडे, दामूअण्णा नवपुते, सजनराव मते, गणेश दहीहंडे, शिवाजी पाथ्रीकर, राजेंद्र काळे, संजय चौधरी, सर्जेराव मेटे, सजन बागल, सरपंच संघटनेचे अध्यक्ष आजिनाथ धामणे व आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन सुदाम ठोंबरे यांनी केले. फुलंब्री तालुकाध्यक्ष सांडु आण्णा जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमास बाजार समिती ,खरेदी-विक्री संघाचे सर्व संचालक, तालुक्यातील सरपंच, चेअरमन व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.




## माजी विद्यार्थ्यांच्या कृतज्ञतेने भारावले गुरुजन ; दाटून आला कंठ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर येथे दि.१७/११/२३ रोजी शाळेला दिली 'वेबसाईट 'ची अनोखी भेट २५ वर्षानंतर अनुभवले शाळेचे दिवशी 'यारा तेरी यारी को ,मैने तो खुदा माना ' असे म्हणत पहूर येथील आर . टी .लेले हायस्कूल मध्ये तब्बल २५ वर्षानंतर १९९८ -९९ च्या १०वीच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन आपल्या गुरुजनांप्रती व्यक्त केली . या कृतज्ञतेने गुरुजनांना अक्षरशः भारावून आले , बोलताना त्यांचा कंठ दाटून आला. पहूर गृप सोसायटी संचलित आर .टी .लेले हायस्कूलच्या १९९८ - ९९ च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकत्र येऊन रौप्य महोत्सवी कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन केले. निवृत्त शिक्षक वाय .एस .पाटील यांनी अध्यक्षस्थान भूषविले. याप्रसंगी निवृत्त मुख्याध्यापक एस. एस. गावंडे, व्ही. एन. पाटील, सी. टी. पाटील , आर. बी. पाटील, विजय बोरसे यांनी मार्गदर्शन केले. एस. एस. गावंडे यांना तर विद्यार्थ्यांशी बोलताना गहिवरून आले . या वेळी निवृत्त मुख्याध्यापक व्ही . के . बडगुजर , मधुकर बोरसे , ए. पी. पाटील , मुख्याध्यापक एस .व्ही. पाटील , पर्यवेक्षक एस. आर सोनवणे, मधुकर पवार, आर . एम . कलाल, थोरात सर, आर. टी. देशमुख , डॉ . ज्योती चौधरी , सुनिता पाटील , डी. वाय. गोरे , संतोष भडांगे , अनिल पाटील, संतोष महाजन, यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार शांताराम लाठे, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण कुमावत , किरण जाधव आदींची उपस्थिती होती. प्रारंभी शारदा देवी , स्व . किसनराव पाटील , कॅप्टन डॉ. एम. आर लेले यांच्या प्रतिमांचे पूजन करून दिप प्रज्वलन करण्यात आले. ज्ञानेश्वरी भामेरे व सोनल धनगर यांनी नृत्य सादर केले. अध्यक्षांच्या हस्ते रौप्य महोत्सवी केक कापण्यात आला. कल्याणेहोळ गावच्या उपसरपंच उज्वला पाटील यांचा यावेळी सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुजनांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक ज्ञानेश्वर रायपुरे यांनी केले. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेसाठी वेबसाईट तयार करून आंतरराष्ट्रीय स्तरावर शाळेचा झेंडा फडकविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी औक्षण करून गुरुजनांना मानपत्र , स्नेहवस्त्र , पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले . दिवंगत गुरुजन आणि विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विकास हिवाळे यांनी सादर केलेल्या 'मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा ' या कवितेने साऱ्यांनाच मंत्रमुग्ध केले. सर्व विद्यार्थ्यांनी आपला परिचय देवून मनोगत व्यक्त केले . मधल्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गात जाऊन बेंचवर बसण्याचा आनंद घेतला . शाळेच्या खोल्या , आणि फळे अन् मैदान पाहून साऱ्यांच्याच गत आठवणी जाग्या झाल्या. विशेष म्हणजे सर्व मित्र आपल्या कुटूंबासह उपस्थित होते. सूत्रसंचालन कविता पाटील , कल्पना बनकर , राजेंद्र सोनवणे, शंकर भामेरे यांनी केले . आभार स्वप्नील जैन यांनी मानले. सामुहीक वंदे मातरम गाऊन कृतज्ञता सोहळ्याची सांगता झाली. यशस्वीतेसाठी सर्व माजी विद्यार्थी , विद्यार्थीनींनी सहकार्य केले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# धामणीत समृद्धीच्या ब्लास्टिंगमुळे घरांचे नुकसान

## उपोषणाचा ४५ वा दिवस : अखेर महिलांनी काम बंद पाडले

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील धामणी येथील महिलांनी ब्लास्टिंगमुळे नुकसान झालेल्या घरांची नुकसान भरपाई त्वरीत देण्यात यावी या मागणीसाठी साखळी उपोषण सुरु केले आहे. गेल्या ४५ दिवसांपासून हे उपोषण सुरु असुन सदर कंपनीने या उपोषणाची कोणतीच दखल न घेतल्याने अखेर या महिलांनी सुरु असलेले ब्लास्टिंगचे काम बंद पाडले. त्यामुळे आता संबंधित कंपनी नुकसान भरपाई कधी देणार याकडे उपोषणकर्त्या महिलांचे लक्ष लागून राहिले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, धामणी येथे मुंबई नागपुर समृद्धी महामार्गाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग केले जात आहे. सदरचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरू असून सततच्या ब्लास्टिंगमुळे अनेक घरांना मोठ्या प्रमाणात तडे जाऊन पडझड झाली आहे. तसेच शेताच्या पाईप लाईनची ही मोठी नुकसान झाली आहे. घरांना झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी म्हणून काँग्रेसचे उत्तम भोसले व धनंजय भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली धामणीतील ९६ घरातील महिलांनी सोमवार दि. १६ ऑक्टोंबर पासुन उपोषणाला सुरुवात केली होती. समृद्धीचे काम करणाऱ्या कंपनीने नुकसान झालेल्या सर्व घरांचे सर्वे करून मुल्यांकन केले आहे. मात्र अनेक वेळा मागणी करूनही कंपनी मुल्यांकन दाखवत नसल्याने संतप्त झालेल्या महिलांनी अखेर काम बंद पाडले आहे. संबंधित कंपनी कडुन जो पर्यंत घरांची नुकसान भरपाई मिळत नाही व समृद्धी लगतचे गावातील सर्विस रस्ते जो पर्यंत दुरुस्त करून मिळत नाही तो पर्यंत उपोषण सोडणार नाही असा पवित्रा या महिलांनी घेतला आहे. यानंतर संबंधीत कंपनीने ब्लास्टींगमुळे नुकसान झालेल्या घरांचा सर्वे केला मात्र नुकसान भरपाई देण्यास विलंब करीत असल्याने धामणी येथील महिला पुन्हा आक्रमक झाल्या असुन पुन्हा साखळी उपोषणावेळी सुरु असलेले काम बंद पाडले. येत्या आठ दिवसांत भरपाई न मिळाल्यास रास्ता रोको करून निव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे.





# उद्योजक पवार यांच्या वतीने दीपावली स्नेहमिलन २०२३

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** दरवर्षी प्रमाणे शहराचे एम के पी ग्रुप ऑफ कंपनी आणि केशवपुष्प उद्योग समूह चे उद्योजक मनोज पवार यांच्या वतीने राजुरेश्वर मंगल कार्यालय येथे कन्नड शहरातील महिला भगिनी, युवक, युवती यांच्या साठी दिवाळी स्नेहमिलन आयोजन करण्यात आले होते.
अनेक राजकीय, वैद्यकिय, शैक्षणिक, शेतकरी, वकील संघ यांनी हजेरी लावून पवार कुटुंब यांच्या विनंतीला मान देवून शुभेच्छा दिल्या.
यावेळी कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली यावेळी आर्केस्ट्रा, हिंदु संस्कृतीचे भजन, तालुक्यांतील कलावंतांनी गायन केले आणि कन्नड शहरातील जनतेस स्नेहभोजन ठेवण्यात आले होते.
यावेळी आमदार उदयसिंह राजपूत,तहसीलदार विद्याचरण कडवकर, पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर, माजी आमदार नितीन पाटील मित्रमंडळच्या वतीने सभापती सुरेश डोळस, जिल्हा बँकेचे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती तथा जिल्हा बँक संचालक डॉ. मनोज राठोड, नायब तहसीलदार मोनाली सोनवणे,उपमुख्याधिकारी खालेद भाई, रंगनाथ लहाने सर, माजी नगराध्यक्ष बाबु सेठ जैस्वाल, माजी उपनगराध्यक्ष अब्दुल जावेद, नगरसेवक शिवकुमार जैस्वाल, साहेबखा पठाण, बबनराव बनसोड, नगरसेविका अनिता काकासाहेब कवडे, नगरसेवक काकासाहेब कवडे, नगरसेवक बाबा सेठ, ह.भ.प. दिलीप गिरी, संजय वर्मा, भाजपा शहराध्यक्ष सुनील पवार, मुंडवाडी माजी सरपंच काकासाहेब कवडे, नगरसेवक मनोज पवार, प्राध्यापक संतोष मतसागर, माजी सरपंच भरत राठोड गराडा, इत्यादी मान्यवररांची उपस्थीती होती.

# अखंड हरिनाम सप्ताहात दिवसेंदिवस भाविक भक्तांची वाढती गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मधे सप्ताह सांगताला दोन दिवस शिल्लक असताना भजन किर्तन साठी भाविक भक्तांची गर्दी वाढतीचे चित्र आहे.
अखंड हरिनाम सप्ताहाला दि.१४ प्रारंभ झाले तर सांगता २१रोजी आहे. तर सप्ताहात नामांकित हभप महाराजांचे संध्याकाळी रात्री भजन कीर्तन होत असल्याने दिवसांदिवस भाविक भक्त यांची भजन किर्तन ऐकण्यासाठी प्रचंड करत असल्याचे चित्र आहे. सप्ताह सांगतासाठी दोन दिवस शिल्लक आहे व त्यात भक्तांचे लोढेंचलोढे सप्ताह स्थळी संध्याकाळी पोहचत आहे.यात तरुण महिल, पुरुष,नवयुवक नवयुवती भाविक भक्तांची सर्व समावेशक गर्दी दिसून येत आहे.दि.२१ काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसाद (भंडारा) चे आयोजन करण्यात आले आहे.

# सततच्या आजाराला कंटाळून ६५वर्षीय वृद्धाची गळफास लावून आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :**येथुन जवळच असलेल्या वालुर ता.सेलु येथील शेतकरी जेष्ठ नागरिक मारुती लक्ष्मण चौरे(६५)वर्षे हे शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. त्यांना दम्याचा त्रास होता. त्यांनी आर्थिक अडचणी व आजाराला कंटाळून वालूर येथील हॉटेलच्या पाठीमागील परिसरातील बाभळीच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली ही घटना दि.१९ रविवार रोजी पहाटे उघडकीस आली. या घटनेची माहिती मयताचे नातेवाईक यांनी सेलू पोलीस स्टेशनला देताच पोलीस जमादार मारुती जाधव, गुलाब राठोड, नारायण आघाव यांनी सदरील घटनेचा पंचनामा करून मयताचे प्रेत सेलू येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनानंतर शव चौरे कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. नातेवाईकांच्या माहितीवरून सेलू येथील स्टेशन मध्ये आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आलेली आहे.या घटनेचा पुढील तपास बिट जमादार अशोक हिंगे हे करीत आहेत. मयत मारुती चौरे याच्या पश्चात पत्नी,२मुलं,३मुली,सुना, नातवंड,जावाई असा परिवार आहे.

# अपघातात एक जागीच ठार; तर तीन जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** दि. १८ नोव्हेंबर रोजी सरोवराच्या गेटच्या जवळ किन्ही रोड वर इनोवा कार क्रमांक MH 01 AX 9898 जालनकडून लोणार कडे येत असतांना चालकांना नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाला आहे.गाडी रस्त्याच्या खाली पलटी झाली यामध्ये सूरज शिवाजी गुडघे रा. ठाणे जिल्हा ठाणे वय २३ वर्षे यांचा जागीच मृत्यू झाला असुन इतर तीन जखमींना पुढील उपचारासाठी जालना येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहेत. लोणार पोलीस स्टेशनला घटनाची माहिती मिळताच पोलीस निरक्षक निमिश मेहेत्रे,पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घोगरे,पो. जमदार बन्सी पवार, पो.जमदार संतोष चव्हाण, पो. लेखनिक गणेश लोंढे ,पो. बोरे,पो. निकस, पो.भोकरे, ट्रॉफिक पो. गजानन शेजुळ, ट्रॉफिक पो. गीते यांनी धाव घेतली जखमींना उपचारासाठी रूग्णांलयात दाखल केले असून पुढील तपास सुरु आहे.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# वार्षिक तब्लीग इज्तेमाची जोरदार तय्यारी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथ हजरत खाव्जा जर जरी जर बक्ष दर्गा उर्स मैदानावर दि.२३ व २४नोव्हेंबर गुरुवारी व शुक्रवारी आयोजित वार्षिक तब्लीग इज्तेमाची मुस्लिम बांधवांकडून जोरदार तयारी सुरू असुण शहर व ग्रामीण मुस्लिम बांधव येथे विविध कामासाठी सेवा करत आहे. खुल्दाबाद शहरात प्रथमच वार्षिक तब्लीग इज्तेमा होत असल्याने मोठा उत्साह नागरिकांतून दिसून येत आहे. उमुमी इज्तेमासाठी तथा येथे मार्गदर्शन ऐकण्यासाठी येणाऱ्यांसाठी १२-१४ऐकर जमीनीचे सपाटीकरणकरून घेण्यात आले आहे. तर त्यावर वहान व्यवस्था,पाणी पुरवठा व्यवस्था, दवाखाना व्यवस्था, इलेक्ट्रीक लाईट व्यवस्था, बाजार, वजुखाना शौचालय स्नान व्यवस्था तर तालुक्यातील गाव सेंटरनिहय बैठक व्यवस्था, देखरेख साठी चौकीदार नियुक्ती, जमात बनवणे व जमात काढणे व्यवस्था तर दोन दिवस सकाळ दुपार संध्याकाळ मार्गदर्शन करणार यांचे व्यवस्था, शेवटच्या दिवसी इज्तेमात लग्न लावणे (निकाह) व्यवस्था आदि याचे सर्व नियोजन व नियोजनबद्ध कार्यक्रमचे नियोजन तयारी सुरू आहे.तालुक्यातील खुलताबाद शहर तथा ग्रामीण मधील कसाबखेडा, वेरुळ,खुलताबाद ग्रामीण, सुलतानपूर,टाकळी राजेराय, लोणी, बाजार सावंगी सात सेंटरचे मुस्लिम नागरिक ज्यांच्या त्यांच्या जमाती बनवुन व इतर सहभागी होणारे मुस्लिम बांधव दि.२२ बुधवार पासूनच इज्तेमासाठी सहभाग घेणार आहे. यासाठी गत दोनतीन महिन्यांपासून ग्रामस्तरावर जमातीद्वारे मेहनत कार्य सुरु होते. तालुक्यात प्रथमच होत असलेल्या तब्लीगी इज्तेमासाठी शहर व ग्रामीण सेंटर सह वीस ते पंचवीस हजार मुस्लीम व त्यापेक्षा अधिक नागरिक उपस्थित राहण्याचे अनुमान आहे. हे इज्तेमा प्रमुख तथा तालुका आमीर मो.गुलाम रसुल साहेब यांच्या मार्गदर्शन अध्यक्षतेखाली दि.२३-२४नोव्हेंबर दोन दिवसीय तब्लीगी इज्तेम होणार आहे.या इज्तेमासाठी मुस्लिम बांधवांनी सहभाग उपस्थिती दाखवावी असे आवाहन तब्लीगी जमात व शहरवासीयांनी केले आहे.

# समाजात तेढ निर्माण होईल अशा अफवांवर विश्वास ठेवू नका

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** सध्या महाराष्ट्रात एका बाजूने मराठा आरक्षणाच्या धर्तीवर राज्यभर मोठ्या प्रमाणात सभा, आंदोलने व बॅनरबाजी आहे. तर दुसऱ्या बाजूने ओबीसी समाज बचाव मेळाव्याचे आरक्षण बचाव असे धोरण सुरु आहे. राजकीय व विविध संघटना यांच्याकडून मोठ्या प्रमाणात आरोप प्रत्यारोप सुरु असल्याचे आपण पाहत आहे. या धर्तीवर काही अनावधाने राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान अथवा जाती -जातीमध्ये तेढ निर्माण करणारे सोशल मिडियाच्या माध्यमातून प्रयत्न होवू शकतात. यासाठी नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत अफवांवर विश्वास ठेवू नये. राज्यातील व गावोगावी कायदा सुव्यवस्था आबादीत राहील यासाठी सर्व सुज्ञ नागरिकांनी लक्ष ठेवत प्रशासनाने घालून दिलेले नियम यावर लक्ष केंद्रित करण्याचे काम करावे. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून येणाऱ्या मेसेज कडे दुर्लक्ष करून दोन्ही समजात वाद होणार नाही अशी भूमिका इगतपुरी तालुक्यातील नागरिकांनी घ्यावी व पोलीस प्रशासनाला मदत करावी असे आवाहान इगतपुरी पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजु सुर्वे यांच्यासह घोटी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील व वाडीवऱ्हे पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक समीर बारावकर यांनी केले आहे.जातीय तेढ निर्माण करणा-या विरोधात सर्वांनी एकत्र येत धर्मांध असलेल्या व राष्ट्र विरोधी प्रयत्न करणाऱ्याची कायद्याने गय केली जाणार नाही. शहरातील व ग्रामीण भागातील सोशल मीडिया वरील अनेक ग्रुपवर कोणत्याही समाज, जाती बद्दल पोस्ट व्हायरल करण्यात येऊ नये.

# शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी सरसावले पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पावसातील खंड, अनियमित हवामान यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील सोयाबीन व कापसाच्या पिकांवर मोठ्या प्रमाणावर रोगाचा प्रादुर्भाव झाला. त्यामुळे पिकांची मोठी हानी झाली. जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासादायक नुकसान भरपाईची गरज असून यासंदर्भात निर्देश देण्याबाबत राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी १७ नोव्हेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे पत्र देत मागणी केली आहे.

सोयाबीन पिकावर मुळकुज, खोडकुज, रायझेक्टानिया एरीयल ब्लाईट आदी रोगांचा प्रादुर्भाव झाला होता. या पिकांची ना. मुनगंटीवार यांनी प्रत्यक्ष पाहणी केली होती. पिकांच्या नुकसानाची कारणमिमांसा तसेच भविष्यात उपाययोजना करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ज्ञांनी संयुक्त पाहणीचे निर्देश ना. मुनगंटीवार यांनी दिले होते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ज्ञांनी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतशिवारात जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीच्या आधारे तज्ज्ञांनी शासनाला अहवाल सादर केला आहे. आपत्तीच्या या काळात शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे, असे नमूद करीत सुधीर मुनगंटीवार यांनी पंचनाम्यांच्या अहवालाच्या आधारावर चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासादायक नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्रातून केली आहे.



# जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून केला शिवसेनेत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** ज्येष्ठ शिवसैनिक कैलास ढवळे कडवट शिवसैनिक म्हणून अनेक वर्षा पासून सामाजिक कार्यात सहभागी आहेत, या पक्ष प्रवेश मुळे शिवसेना सोयजना या गावातील अनेक कार्यकर्ते शिवसेना या पक्षात प्रवेश केला तालुकाप्रमुख अमोल सुरूंग, शिवसेना तालुका संघटक विजयकुमार गिरी, शिवसेना उप तालुकाप्रमुख नितीन राठोड, शिवसेना, अल्पसंख्यांक तालुकाप्रमुख शेख खाजा शेख चांद, कैलास चव्हाण हे सर्व उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य चे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन जी अग्रवाल साहेब यांनी मागील एक वर्षापासून विविध प्रकारच्या कामाचा धडाका चालू आहे गोर गरीब जनतेच्या मदत करणारा मुख्यमंत्री आहे ,त्यांच्या पासून मला काम करण्याची प्रेरणा मिळत आहे त्या मुळे मी मा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन जी अग्रवाल यांच्यावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला आहे.



# इगतपुरी तालुक्यात जरांगे पाटील यांच्या सभेची तयारी पूर्ण; मंगळवारी त्र्यंबकेश्वरमध्ये

## शेणीत येथे लाखोंच्या संख्येने समाज उपस्थित राहणार

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** मराठा आरक्षणासाठी जीवाची पर्वा न करता उभ्या महाराष्ट्रात रान पेटवनारे मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे मंगकवार दि 21 व बुधवार 22 नोव्हेबर रोजी नाशिक जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. सोमवारी पालघर मार्गे जरांगे पाटील व त्यांचा ताफ़ा श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर चरणी नतमस्तक होणार असून त्यानंतर सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते व नेत्यांशी ते हितगुज़ करुण आरक्षण लढा प्रभावी करण्यासाठी मार्गदर्शन करुण आढावा घेणार आहेत. याच ठिकाणी ते मुक्कमी राहणार असून दुसऱ्या दिवशी बुधवार दि 22 रोजी इगतपुरी तालुक्यातील शेणित येथे सकाळी 10 वाजेच्या विराट सभेला ते मार्गदर्शन करणार आहेत. राज्य शासनाला मराठा आरक्षणा संदर्भात जो कालावधी दिला आहे त्या मुदतीत शासनाने योग्य तो निर्णय घेतला नाहीच तर पुढील काळात मराठा आरक्षण मागनीच्या आंदोलनाची दिशा ठरविन्यासाठी हा दौरा महत्वपूर्ण ठरणार आहे. दरम्यान मराठा आरक्षणाला विरोध करणारे मंत्री छगन भुजबळ यांचाहि खरपुस समाचार या सभेत घेतला जाणार असल्याच्या शक्यतेने जिल्ह्यातील तमाम मराठा समाज लाखोंच्या संख्येने उपस्थित राहणार असल्याने सभेची तयारी जवळपास पूर्ण झाली असून तालुक्यातील मराठा समाजाची गावे आपापल्या गावांत बुधवारी मोढा पाळनार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. इगतपुरी तालुक्यातील शेणित येथे सुमारे 101 एकर क्षेत्रफळ असलेल्या जागेवर बुधवारी सकाळी मनोज जरांगे पाटील यांची तोफ धडाडनार आहे. त्या दृष्टीने गेल्या दहा बारा दिवसांपासून इगतपुरी, सिन्नर, नाशिक तालुक्यातील मराठा कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने कामाला लागले आहे. स्वयंसेवक यांची नियुक्ति करण्यात आली असून मध्यवर्ती ठिकाणी भव्य उघड़े स्टेज व मंडप व्यवस्था करण्यात आली आहे. नाशिक, इगतपुरी, सिन्नर आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील मराठा समाजाचे विविध नेते आणि तमाम सकल मराठा समाजातर्फे दररोज सभास्थळी येवून सभेच्या तयारी बाबत सूचना मार्गदर्शन करण्यात येत आहे. ठिकठिकाणी गावोगावी फलक लावून समाजाला व नागरिकांना उपस्थित राहण्यासाठी आश्वस्त करण्यात येत आहे. आज सभा स्थळा वरतुन जरांगे पाटील यांचा फोटा असलेला फुगा सोडण्यात आला व त्याच प्रमाने सर्व आर्किटेक्ट प्लान करण्यात आला आहे.



# फुलंब्री-औरंगाबाद महामार्गावर वाहतूक कोंडी

## वाहतूक पोलीस गायब : शहरातील दुकानासमोरील अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करा

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**औरंगाबाद :** जळगाव महामार्गावरील फुलंब्री शहरात गेल्या काही दिवसापासून औरंगाबाद रोडवर व फुलंब्रीच्यावर वाहतुकीची रांगच रांग लागत आहेत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्यासह वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष दिसत आहेत. सध्या दीपावली व भाऊबीज या सणाच्या निमित्ताने दररोज नागरिकांची जायनी सुरू आहे यामध्ये फुलंब्री शहरात दररोज वाहतूक वाहतुकीची कोंडी होत आहे यात सर्वसामान्य वाहनधारकांची गैरसोय होत आहे फुलंब्रीच्या टी पॉइंटवर वाहतूक पोलिसांची उपस्थित नसल्याने अपघात होण्याची शक्यता वाढत आहेत फुलंब्रीच्या कायमस्वरूपी एक वाहतूक पोलीस नेमावे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. औरंगाबाद-जळगाव महामार्गावरील फुलंब्री शहरातील टी पॉइंट परिसर , फुलंब्री चा बसस्थानक परिसर याठिकाणी जास्त वाहतूक कोंडी होत आहे.

**फुलंब्री टी पॉइंट वर पार्किंग व्यवस्था नाही,वाहने भर रस्त्यावर उभी :**
सध्या औरंगाबाद जळगाव महामार्गाचे काम झपाट्याने चालू आहे तर काही ठिकाणी संथगतीने सुरू आहे . परंतु फुलंब्री शहरातील खुलताबाद रोडवरील दुकानदारांनी चार पदरी रस्त्याला दुपदरी करून टाकली आहे . सार्वजनिक ठिकाणी पार्किंग व्यवस्था नसल्याने दुचाकी किंवा चारचाकी वाहने भर रस्त्यावर उभी करून देत आहे . यामध्ये अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही . यासाठी अतिक्रमण विभागाचे अधिकार्यांनी व नगरपंचायतीच्या अधिकार्यांनी लक्ष देऊन खुलताबाद रोडवरील दुकानासमोरील अतिक्रमण हटावे . व जा येण्यासाठी रस्ता मोकळा करून द्यावे अशी मागणी फुलंब्री शहरातील नागरिक करीत आहे .






# सेवानिवृत्त जवानाचे जंगी स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लष्करातून निवृत्त होऊन गावी परतलेल्या बहुतांश सैनिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.तसेच नेर गावाचे एकच कुटुंबाची दोधे भाऊ "CRPF" "सेंटर रिझर्व पोलीस फोर्स" यामध्ये २००३ मध्ये पुणे येथे जॉइनिंग झाले होते .

धुळे तालुक्यातील नेर येथे मात्र निवृत्त होऊन गावात आलेल्या जवानाचे रथ मध्ये बसून गावात मिरवणूक काढण्यात आली तसेच गावकऱ्यांनी फुलहार घालून पुष्पगुच्छ देऊन गावकऱ्यांनी स्वागत करण्यात आले. नेर येथील जवान श्री अविनाश लक्ष्मण बोडरे यांना जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी सोबत लढत होते तेव्हा अनोखा अनुभव आला.

श्री विकास लक्ष्मण बोडरे हे ही यांनी खूप मोठे मोठे ऑपरेशन मध्ये सहभाग घेतला आहे अविनाश आणि विकास हे पुण्यामध्ये भरती झाले त्यानंतर दोघ भाऊ यांची पोस्टिंग वेगवेगळ्या ठिकाणी झाली जसे की अविनाश हे गुजरात आसाम मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये छत्तीसगडमध्ये त्यानंतर गडचिरोलीमध्ये आले अविनाश भाऊंना मेडल देण्यात आले तसेच विकास हे ही आसाम प्रयागराज वाराणसी जम्मू कश्मीर झारखंड मुंबई येथील अनेक मी ठिकाणी बदली होऊन ते दोघ भाऊ सुखरूप घरी पोहोचले अविनाश भाऊ आणि विकास भाऊ हेड कॉन्स्टेबल लष्करातील सेवा पूर्ण करून ते गावात परतले.

गावापासून दूर राहून २१ वर्ष सेवा पूर्ण करून सुखरूप घरी आले नेर गावकऱ्यांनी आणि सैनिक क्लब यांनी जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली.या स्वागताने नेर गावाचे ग्रामस्थ भारावून गेले. 'मातृभूमीची सेवा करून परतलो आहे.नोकरीची सेवापूर्ती झाली असली तरी देशसेवा अंतिम श्वासापर्यंत सुरूच राहील,' अशी प्रतिक्रिया देण्यात आली.

# बसला आले अच्छे दिन, सर्व बसेस खचाखच

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** दिवाळी बघता बस महामंडळाला अच्छे दिन असल्याचे चित्र आहे. सद्या दिपावली सण चं हंगाम सुरू असुण खाजगी वहान बरोबरच बस परीवहान महामंडळचे बसेस खचाखच भरुन ये जा करत आहे. येथे कन्नड आगाराच्या चार बसेस कन्नड बाजार सावंगी फुलंब्री व पुन्हा कन्नड अशा दोन दोन फेऱ्या करत आहे तर छ.संभाजीनगर आगाराच्या दोन बसेस ये जा दोन फेऱ्या करतात बाजार सावंगी दरेगाव या प्रमाणे फेऱ्या करतात सद्या दिवाळी सुरू असल्याने शालेय विद्यार्थी मुली जवाई सुना दिवाळी ये जा करत असल्याने बसेस मध्ये प्रचंड गर्दी दिसून येत आहे.त्यामुळे खाजगी वहानाबरोबरच बस परिवहान महामंडळ च्या बसेस खचाखच भरून ये जा करत असल्याने बसेस महामंडळाचे अच्छे दीन दिसून येत आहे.





# वडोद बाजार येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या दोन वर्गखोल्यांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळेच्या दोन वर्ग खोल्याचे उद्घाटन करण्यात आले आमदार हरिभाऊ बागडे यांच्या निधीतून वडोद बाजार येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दोन वर्ग खोल्याचे उद्घघाटन रविवारी सकाळी दहा वाजता करण्यात आले या वेळी सरपंच पकीजा पठाण, उपसरपंच गोपाळ वाघ , रामदास पाथ्रे, गोविंद पांडेजी ,समिती अध्यक्ष नवीन सिद्दिकी मजहर शेख, जनार्दन शिंगारे, रमेश वाघ, अंजुम शेख, साबेर पठाण, अनिल वाघ रामदास कापसे, उमर शेख, गणेश वाघ , बळवंत,वाघ अनिल वाघ, बबन मंदाडे, दोलत वाघ, ककाजी कोलते , अरूण वायकेस, कृष्णा सहाणे, मनोज वाघ, रेशमाजी वाणी, बाळू वाघ, बबन मंदाडे, शेख सद्दाम, शेख शकील,आदी स ह ग्रामस्थ उपस्थित होते.



# वडोद बाजार येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याच्या टाकीचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथे पण मिशन अंतर्गत जल जीवन मिशन अंतर्गत पाण्याच्या टाकीचे उद्घाटन करण्यात आले. वडोद बाजार येथे पाणीपुरवठ्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत विहीर पाईपलाईन व पाण्याच्या टाकी मंजूर असून वडोद बाजार येथील वडोद वस्ती याठिकाणी पाण्याच्या टाकीचे शनिवारी उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी वडोद बाजारचे सरपंच पाकिजा पठाण, उपसरपंच गोपाळ वाघ ग्रामविकास अधिकारी रामदास पाथरे, सदस्य शेख राजीक शेख ,शुभम गंगावणे, बाबुराव मंदाडे आसाराम कोलते गोविंद पांडे जी काकाजी कोलते रमेश वाघ शिंगारे अशोक शिंगारे शेख सलमान शेर खापाठाण साबेर पठाण माजी सरपंच शेख रजाक, गणेश कोलते, शेख अंजुम, सोमीनाथ कोलते, मिर्झा बेग, रामकिसन वाघ, अनिल वाघ, बाळु खुळे, शेख रईस, दोलात वाघ, नितीन सदावर्ते, अतुल भाले, जनार्दन शिनगारे, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. पाण्याच्या टाकीचा शनिवारी उद्घाटन करण्यात आले या पाण्याच्या टाकी मुळे वडद वस्ती परिसरातील पाणीटंचाईचा प्रश्न मिटणार आहे.

